सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २६ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हिंदी कुठल्याही भाषेची शत्रू नाही... हिंदी सर्व भारतीय भाषांचा मित्र आहे - अमित शहा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ नवी दिल्ली**



देशात सुरू असलेल्या भाषावादावरून पुन्हा एकदा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाष्य केले आहे. देशात गएए, छएएढ आणि उणएढ च्या परीक्षा एकूण ३ भाषांमध्ये होत आहेत. याआधी उठझऋ कॉन्स्टेबल भरतीसाठी लोकांकडे हिंदी आणि इंग्रजीचा पर्याय होता. केवळ या दोन भाषेतच अर्ज भरू शकत होता मात्र आम्ही त्यात अन्य १३ भाषांमध्ये परीक्षा देण्याची परवानगी दिली. देशातील ९५ टक्के उमेदवार आज त्यांच्या मातृभाषेत परीक्षा देत आहेत. येणाऱ्या काळात भारतीय भाषांचे भविष्य उज्ज्वल आहे असं शाह यांनी म्हटलं आहे.


केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, हिंदी भाषा कुठल्याही भारतीय भाषेची शत्रू नाही. हिंदी सर्व भारतीय भाषांची मित्र आहे. हिंदी आणि इतर भारतीय भाषा मिळून आपल्या स्वाभिमान कार्यक्रमाला अंतिम लक्ष्यापर्यंत पोहचवू शकतात. मागील काही दशकांपासून भाषेचा वापर भारतात विभागणी करण्यासाठी होत आहे. ते भारताला तोडू शकत नाहीत पण प्रयत्न करतायेत. आपल्या भाषा भारताला एकजूट करण्यासाठी सशक्त पर्याय बनतील हे आम्ही करू. मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही अधिकाधिक भाषा विभागावर काम करत आहोत. २०४७ मध्ये महान भारत विकसित होईल. यात भारतीय भाषांच्या विकासासाठी, समृद्धतेसाठी त्याचा वापर वाढेल असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय सरकारी कामकाजात भारतीय भाषांचा वापर जास्तीत जास्त व्हायला हवा. हे काम केवळ केंद्र सरकारच नाही तर राज्य सरकारनेही करायला हवे. त्यासाठी आम्ही सर्व राज्यांच्या संपर्कात आहोत. त्यांना समजावून तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत असंही अमित शाह यांनी म्हटलं.

## 'पाणी सोडणार नाही, जे करायचे ते करा...', युद्धाची धमकी देणाऱ्या भुट्टोला भारताचे एका ओळीत उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानेपाकिस्तानसोबत असलेला सिंधू पाणी करार अनिश्चित काळासाठी स्थगित केला आहे. सिंधूचे पाणी रोखल्यामुळे पाकिस्तानात दुष्काळसदृष्य परिस्तिती उद्भवली आहे. त्यामुळेच पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) प्रमुख आणि माजी पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी सातत्याने भारताला युद्धाच्या पोकळ धमक्या देत आहे. आता या धमक्यांना भारताने चोख उत्तर दिले आहे.




२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या पाच प्रमुख निर्णयांपैकी पाकिस्तानला सर्वात जास्त रडवणारा निर्णय म्हणजे सिंधू पाणी करार रद्द करणे. पाकिस्तान या निर्णयावर इतका संतापला आहे की, वारंवार धमक्या देत आहे. बिलावल भुट्टो झरदारी याच्याकडे धमक्या देण्याचे काम दिले असून, ते सतत सिंधूचा मुद्दा उपस्थित करतात आणि भारताला युद्धाची धमकी देत राहतात. आता पुन्हा एकदा त्यांनी धमकी दिली की, 'जर सिंधूचे पाणी थांबवले, तर आम्ही सर्व सहा नद्या ताब्यात घेऊ. युद्धापासूनही मागे हटणार नाही...'

बिलावल भुट्टोच्या धमक्यांवर जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी एका ओळीत म्हटले की, पाणी कुठेही जाणार नाही, जे काही बोलायचे आहे ते बोलत राहा. भुट्टो जे बोलतात, तो त्यांचा प्रश्न आहे. त्यांना राजकारण करायचे असेल, तर ते करत राहावे. 'पाणी वाहिले नाही, तर रक्त वाहेल', अशी धमकीही त्यांनी दिली होती. अशा धमक्यांना आपण घाबरत नाही, असे प्रत्युत्तर पाटील यांनी दिले. अलिकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील स्पष्टपणे सांगितले होते की, सिंधू पाणी करार कधीही पूर्ववत होणार नाही.

## दुचाकी वाहनांवर टोल आकारण्याचा कोणताही प्रस्ताव नाही; नितीन गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नागपूर**



राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १५ जुलै २०२५ पासून दुचाकी वाहनांकडून टोल वसून केला जाणार आहे, अशा बातम्या प्रसारमाध्यमांत झळकत आहेत. त्यामुळे वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, या केवळ अफवा असून दुचाकी चालकांकडून कोणत्याही प्रकारे टोल घेतला जाणार नाही, असे केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोशल मिडियावर पोस्ट केली आहे.

एनएचएआयच्या नवीन तरतुदींनुसार दुचाकी वाहनांना राष्ट्रीय महामार्गावर धावण्यासाठी टोल कर भरावा लागेल. टोल भरण्याचे टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा फास्टॅग न वापरणाऱ्या दुचाकीस्वारकडून २ हजारांचा दंड आकारला जाईल, अशा बातम्या प्रसारमाध्यमांत दाखवल्या जात आहेत. यावर नितीन गडकरी यांनी प्रतिक्रिया दिली असून या केवळ अफवा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नितीन गडकरी म्हणाले की, काही माध्यमांद्वारे राष्ट्रीय महामार्गांवर दुचाकी वाहनांकडून टोल वसूल केला जाणार आहे, अशा दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवल्या जात आहेत. परंतु, असा कोणताही निर्णय झाला नाही. दुचाकी वाहनांना टोल शुल्कातून सूट देण्यात आली. सत्य जाणून न घेता दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवू नयेत. मी अशा माध्यमांचा निषेध करतो.

## आयएफएस झाले, पेढेही वाटले; पोस्टिंग मात्र नाहीच

### आनंद क्षणभंगुर, भारतीय वनसेवेतील ४० अधिकाऱ्यांच्या बदल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



राज्याच्या वनविभागात मनमर्जी कारभार हाकला जात असून, महिनाभरापूर्वी आयएफएस झालेल्या २७ वनाधिकाऱ्यांनी पेढे वाटले. मात्र, त्यांच्या पदरी निराशा पडली. मंगळवारी (दि. २४) ४० आयएफएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश धडकले. मात्र, यात २४ नव्या आयएफएस यांना पोस्टिंगसाठी ताटकळत ठेवण्याचा प्रकार घडला आहे.

राज्य शासनाच्या तन व महसूल विभागाने २४ जून रोजी महाराष्ट्रातील ४० आयएफएस अधिकाऱ्याच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत, यात संजीव गौड, विवेक खांडेकर या प्रधान मुख्य वनसंरक्षकांना (दुय्यम) पदावर बढती मिळाली, तर यामध्ये ४ मुख्य वनसंरक्षक, ३ वनसंरक्षक आणि २७उपवनसंरक्षकांची पोस्टिंग देण्यात आली आहे. नागपूरच्या वनभवनात गत ३ वर्षापासून ठाण मांडून बसलेले अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कल्याण कुमार यांच्या खुर्चीमध्ये बदल करण्यात वनविभाग नापास ठरला, तर चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगांवकर यांना वर्षभरातच चंद्रपूरमधून हटविण्यात आले आहे. आयएफएस अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी चांगली पोस्टिंग मिळावी, यासाठी काही पदे अपग्रेड करण्यात आल्याचे या बदली यादीवरून दिसून येते.

**२३ अधिकारी वेटिंगवर**

चार वर्षापासून राज्य सेवेतील वनाधिकाऱ्यांना आयएफएस पोस्टिंग देण्यात आली नव्हती.

५ वर्षाच्या कालावधीनंतर अखेर २७ वनाधिकाऱ्यांना आयएफएस अवॉर्ड मिळाले.

२ जून रोजी आदेश पारीत झाल्यानंतर २३ दिवसांनीसुद्धा पोस्टिंग देण्यात आलेली नाही.

४० आयएफएस यांच्या बदल्यांच्या यादीत नव्याने आयएफएस झालेल्या २७ पैकी केवळ चार अधिकाऱ्यांना पोस्टिंग देण्यात आली असून, उर्वरित २३ अधिकारी वेटिंगवर आहेत.

## मोर्चाला कोण येणार नाही हेही मला बघायचंय राज ठाकरेंची हिंदी सक्तीविरोधात भव्य मोर्चाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**




पहिली इयत्तेपासून राज्यात तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा शिकविण्याच्या राज्य सरकारच्या सक्तीविरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोठी घोषणा केली आहे. ६ जुलै रोजी गिरगाव चौपाटीवरून हिंदी सक्तीविरोधात भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे राज ठाकरे यांनी केली आहे.

या मोर्चाला कोणताही झेंडा नसणार आहे. फक्त मराठी हाच या मोर्चाचा अजेंडा असणार आहे, असे राज म्हणाले. तसेच राज यांनी या हिंदी सक्तीविरोधात सर्व राजकीय पक्षांनी या सामील व्हावे असे आवाहन केले आहे. राज्यातील प्रत्येक मराठी माणसाने मोर्चात सामील व्हावे असेही राज ठाकरे म्हणाले आहेत.

मनसेकडून जाहीर झालेले असले तरी या मोर्चाचे नेतृत्त्व कोणताही पक्ष नाहीय, तर मराठी माणूस करणार असल्याचेही राज यांनी स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर राज ठाकरे यांनी मोर्चाला कोण येणार नाही हेही मला बघायचे आहे, असा गर्भित इशाराही दिला आहे. राज ठाकरे यांचा हा इशारा कोणासाठी आहे याची चर्चा आता रंगणार आहे. राज यांनी कलावंतांना हा इशारा दिल्याचे समजते आहे.

## उबाठा नेते आ. भास्कर जाधव यांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीची ऑफर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अकोला**



उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षात सध्या नाराजीसत्र सुरु आल्याचे पाहायला मिळतंय. पक्षातील मोठे नेते आणि आमदार भास्कर जाधव नाराज असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी भाषण करण्याच्या मुद्यावरुन केलेले विधान चर्चेत होते. भास्कर जाधव यांनी बोलताना संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली होती. नाराजीच्या चर्चा सुरु असताना भास्कर जाधव यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून ऑफर देण्यात आलीये.

शिवसेना ठाकरे गटात नाराज असलेल्या नेते आणि आमदार भास्कर जाधव यांना आता थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीने पक्षप्रवेशाची ऑफर दिलीये. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी भास्कर जाधवांनी अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीत प्रवेश करावा असं मिटकरींनी म्हटलंय. भास्कर जाधव यांच्या अनुभवाचा पक्षाला आणि राज्याला फायदा होणार असल्याचे आमदार मिटकरी म्हटले. आमदार मिटकरी यांच्या या ऑफरने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलंय.

मिटकरींनी पुढे बोलताना म्हटलं की.. जाधवांच्या व्यथा, अनेक दिवसांच्या संवेदना लपून राहलेल्या नाहीये.. त्यांच्या सारख्या खमक्या वाघाने परिवर्तन केलं पाहिजे.. त्यांनी राष्ट्रवादीत यावं, अशी विनंती मिटकरींनी केलीय.. तसेच जाधव यांना तिकडं अस्वस्थ वाटत असेल तर त्यांच्यासाठी राष्ट्रवादीचे दारं उघडे आहेत.. राष्ट्रवादी त्यांना योग्य सन्मान दिला जाईल, असेही मिटकरी म्हटले.. ते अकोल्यात बोलत होते.

## अमरावतीसह राज्यभरात पावसाची रिपरिप वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

राज्यभरात पुढील ५ दिवस जोरदार पावसाचे राहणार असल्याचे हवामान विभागाने सांगितलं आहे. कोकणपट्ट्यासह मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस राहणार आहे .हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी विविध भागात पावसाचे तीव्र अलर्ट दिले आहेत . केरळ ते दक्षिण गुजरात या पश्चिम किनारपट्टीवर मान्सूनच्या ढगांचे पट्टे दिसून येत आहेत .त्यामुळे पुढील तीन ते चार तासात परभणी, नांदेड मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे .तसेच मुंबई, ठाणे व उत्तर महाराष्ट्रात जोरदार पाऊस होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

अमरावती सह राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे . मध्य महाराष्ट्रातील काही भाग वगळता किनारपट्टी भाग उत्तर महाराष्ट्र व मराठवाडा व विदर्भात जोरदार पाऊस होत आहे.

## राज्यात 'आप' स्वबळावर लढणार, कोणत्याच पक्षाशी युती नाही, एकला चलो रे निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६वर्धा**



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट भूमिका मांडली. त्यानंतर राजकीय हालचाली वेगात वाढल्या. स्थानिक पुढाऱ्यांनी कंबर कसली. तर वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन दौरे सुरू झालेत. युती ही स्वबळ याचीही चर्चा सूरू झाली आहे. त्यात आता आम आदमी पार्टी म्हणजेच आप पक्षाने आपली भूमिका जाहीर करून टाकली आहे.

वर्धा जिल्हा आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष श्रीकांत दोड यांच्या नेतृत्वात स्थानिक विश्राम भवन येथे जिल्हास्तरीय आढावा बैठक झाली. होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी अनुषंगाने चर्चा झाली. महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्य प्रभारी तथा दिल्ली विधानसभेचे माजी आमदार प्रकाश जारवल यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रदेशाध्यक्ष अजित दादा फाटके पाटील यांच्या नेतृत्वात पुणे येथे राज्यस्तरीय आढावा बैठकीत या निवडणुकीबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. देण्यात आलेल्या सुचना वजा आदेशाची अंमलबजावणी करत महाराष्ट्र राज्यात होऊ घातलेल्या संभाव्य जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत, पंचायत समिती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी आम आदमी पार्टी स्वबळावर स्वतंत्ररित्या लढणार असुन कोणत्याही प्रकारची युती कोणत्याच पक्ष सोबत करण्यात येणार नसल्याचे राज्य प्रभारी प्रकाश जारवल यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले. याच अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष अजितदादा फाटके पाटील यांनी सर्व जिल्हाध्यक्ष यांना जिल्ह्यात आढावा बैठकी आयोजित करून इच्छुक उमेदवार चाचपणी आणि निवडणुकीचे जिल्हास्तरीय नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## फडणवीसांनी लोणीकरांना 'त्या' मुजोर वक्तव्यावरून चांगलच फटकारलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**

भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांची जीभ पुन्हा एकदा घसरल्याचे दिसून आले आहे. एका भाषणादरम्यान, सोशल मीडियावर सरकार आणि स्वतःच्या विरोधात टीका करणाऱ्या तरुणांविषयी त्यांनी आक्रमक शब्दांत संताप व्यक्त केला. कुचरवट्यावर बसलेली काही रिकामटेकडी कार्टी सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अंधभक्त म्हणतात, असे म्हणत त्यांनी टीकाकारांवर सडकून टीका केली. या तरुणांविषयी बोलताना, हीच कार्टी कूचवट्यावर बसून चर्चा करत असते, आणि त्यांच्यापैकी काहींच्या आईचा पगार व बापाचे पेन्शन बबनराव लोणकर यांनीच दिलं आहे, असे त्यांनी म्हटले. तसेच, नरेंद्र मोदींनी तुझ्या बापाला पेरणीसाठी सहा हजार रुपये दिले, असेही वादग्रस्त वक्तव्य बबनराव लोणीकर यांनी केले. आता बबनराव लोणीकर यांच्या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी त्यांना खडेबोल सुनावले आहेत.




देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बबनराव लोणीकरांचं विधान हे पूर्णपणे चुकीचं आहे. त्यांनी जरी काही लोकांना उद्देशून असं वक्तव्य केलं असलं तरीही अशा प्रकारचं विधान करायचा कुणालाही अधिकार नाही. देशाचे प्रधानमंत्री ज्यावेळेस सांगतात की, मी प्रधान सेवक आहे आणि आम्ही सर्व जण जनतेचे सेवक आहोत. तर आम्हाला मालक बनता येणार नाही. त्यामुळे बबनराव लोणीकरांचे जे वक्तव्य आलेलं आहे ते पूर्णपणे चुकीचं असून अशा प्रकारचं वक्तव्य योग्य नाही. याची समज बबनराव लोणीकर यांना देण्यात येईल, असे त्यांनी म्हटले आहे.

संपादकीय ......

# अफाट कर्तृत्वाचा लोकराजा

राजर्षी शाहू महाराज यांचे कर्तृत्व अफाट होते आणि त्यांची प्रतिभाही तेवढीच अफाट होती. तळागाळातील समाजासोबत असलेली त्यांची बांधिलकी आजच्या काळातही आपल्याला विचार करायला लावणारी आहे. शाहू महाराज हे देशातील पहिले राजे होते, ज्यांनी स्वतःच्या संस्थानात आरक्षण सुरू केले. सामाजिक समतेच्या दृष्टीने शाहूंचे विचार आजही मोलाचे ठरणार आहेत. औद्योगिकीकरण करणे, शेतीबरोबर जोडधंदेही असावेत, पाण्याचे नियोजन, विजेचा प्रश्न, शेतकर्यांसाठी व्यापारी पेठ, तरुण मुलांना साजेशी मल्लविद्या या शाहू महाराजांच्या कार्याचे आणि विचारांचे अनुकरण करण्याची मोठी गरज आहे.

शाहू महाराज यांचा जन्म १८८४ चा आहे आणि १९२२ मध्ये त्यांचे निधन झाले. म्हणजेच त्यांना पन्नास वर्षांचेच आयुष्य लाभले; पण एवढ्या आयुष्यातही त्यांनी जे कार्य केले ते मोठे होते. त्यांच्या राज्याचा रोहण समारंभ १८९४ मध्ये झाला आणि ते दत्तक म्हणून कोल्हापूरला आले होते. आपल्याकडे सयाजीराव किंवा शाहू महाराज हे असे काही संस्थानिक होऊन गेले, ज्यांची प्रतिभा आणि तळागाळातील समाजासोबत असलेली बांधिलकी आजच्या काळातही आपल्याला विचार करायला लावणारी आहे. शाहू महाराजांच्या जीवन प्रवासाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. १९१९ मध्ये कोल्हापूर संस्थानात माणगावला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा झाली होती. बाबासाहेब हे दलित समाजातील होते. त्यामुळे तिथल्या सभेत काही लोकांनी बोलताना शाहू महाराज आमचे नेते आहेत, असा उल्लेख भाषणामध्ये केला; परंतु शाहू महाराजांनी त्या परिषदेत सर्वांना सांगितले की, तुमचे नेते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत. वास्तविक पाहता, तेव्हा बाबासाहेबांचा काळ सुरू व्हायचा होता. त्यावेळी ते शिक्षण घेत होते, तरीही शाहू महाराजांनी त्यांचा अशाप्रकारे उल्लेख केला होता, हे लक्षात घ्यावे लागेल. यानंतरच्या काळात त्यांची आणि बाबासाहेबांची गट्टी जमली.बाबासाहेब आंबडेकर लंडनमध्ये शिकायला असताना त्यांनी शाहू महाराजांना एक पत्र लिहिले होते. यामध्ये त्यांनी लंडनमध्ये ब्राम्हणेत्तर पक्षासाठी काही कार्य करायचे असेल, तर ते मी करू शकेन, असे कळवले होते. त्यावेळी कौन्सिलच्या निवडणुकांसाठी ब्राह्मणेतर पक्ष निर्माण झाला होता आणि त्याला संसदेत स्थान होते. डॉ. आंबेडकर यांना शिक्षणासाठी सयाजीरावांनीही मदत केली; पण त्यांच्या जीवनात शाहू महारांजांचे एक वेगळे स्थान होते. याचे कारण शाहू महाराजांचा पहिल्यापासून कल हा तळागाळातील लोकांकडे होता. त्यांच्याकडे राहणारी अभयारण्यातील जी धनगर मंडळी होती, ज्यांना 'डंगी धनगर' म्हणून संबोधले जात असे, त्यांच्याशी राजर्षी अतिशय प्रेमाने वागायचे. हे प्रेम इतके प्रामाणिक होते की, शाहू महाराज त्यांची भाकरी खात असत, त्यांना स्वतःचे जेवण देत असत, त्यांना स्वतःच्या पंगतीला जेवायला बसवत असत. यामध्ये कुठेही नाटकीपणा वा ढोंगीपणा नव्हता. शाहूंना काही कुठली निवडणूक लढायची नसल्यामुळे वा मते मिळवायची नसल्यामुळे अशा प्रकारचा नाटकीपणा करण्याची गरजच नव्हती; पण राजा असूनसुद्धा मनापासून प्रेम ज्याला म्हणतात ते त्यांनी अभिव्यक्त केले.

प्रेमळपणासोबतच शाहूंची दूरदृष्टीही विलक्षण होती. त्यांनी सामाजिक समतेचा जो विचार आहे तो फक्त शब्दातून न मांडता कृतीतून दर्शवून दिला. सामाजिक न्यायाचा प्रश्न त्यांनी स्वतःच्या संस्थानात हाताळला. याचे उदाहरण म्हणजे आरक्षण. शाहूंच्या पूर्वीच महात्मा जोतिबा फुले यांनी आरक्षणाची मागणी केलेली होती. समाजाने ज्यांना मागे ठेवले आहे, उपेक्षित ठेवले आहे त्यांना विशेष संधी दिली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. १९०२ मध्ये शाहू महाराजांनी फुलेंची ही मागणी प्रत्यक्षात आणली आणि त्यांच्या संस्थानामध्ये राखीव जागांची सुरुवात केली. शाहू महाराज हे देशातील पहिले राजे होते ज्यांनी स्वतःच्या संस्थानात आरक्षण सुरू केले.

शाहूंचे दुसरे सर्वात मोलाचे कार्य म्हणजे त्यांनी शिक्षणाला दिलेली चालना. त्या काळात 'लिव्हणं ब्राह्मणाचं आणि दानं कुणब्याचं' अशी म्हण प्रचलित होती. कुणबी म्हणजे शेतकरी. कुणब्याने कधी अक्षराच्या बाजूला जाऊ नये, असे म्हटले जात असे. समाजाची ही मानसिकता लक्षात घेऊन शाहू महाराजांनी विद्यार्थ्यांसाठी जातवार वसतिगृह तयार केली. यामध्ये जैन, मराठा, ख्रिश्चन, अस्पृश्य आदींसाठी शाहूंनी उभारलेली वसतिगृहे आजही कोल्हापुरात आहेत. या वसतिगृहांमुळे खेड्यापाड्यांतून कोल्हापुरात शिक्षणासाठी येणार्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली.

शाहू महाराजांना मल्ल मानलं गेलं आहे. कुस्त्यांसाठी आणि कुस्तीगीर घडवण्यासाठीही त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक प्रयत्न केले. भीमकाय, निरोगी शरीरयष्टी शाहू महाराजांना निसर्गतःच लाभली होती. स्वतःप्रमाणे आपली प्रजाही बलदंड व निरोगी शरीराची व्हावी म्हणून त्यांनी कोल्हापुरात अनेक तालमींची निर्मिती केली. या तालमीतून पैलवानांच्या राहण्याची आणि दैनंदिन खुराकाची, तसेच पैलवानांना मार्गदर्शन करण्यासाठी अनेक नामवंत वस्तादांची सोय करून दिली. प्रत्येक तालमीत तयार होणार्या पैलवानांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून कुस्त्यांची मैदाने भरवण्यात येऊ लागली. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे कार्य केले. जयसिंगपूरसारखी व्यापारी नवी पेठ तयार केली. नंतर शाहू मिल उभी केली.राधानगरीचे धरण बांधले. या धरणाच्या पाण्यावर लिफ्ट इरिगेशनची सुरुवात झाली. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न शाहूंनी सोडवला. तसेच मुली व्यायाम करत असताना कोणी बघू नये, त्यांना मोकळेपणाने खेळता यावे म्हणून शाळेभोवती कंपाऊंड बांधून घेतले. शाहू महाराज राहणीमानात साधे होते. ते स्वतःला शेतकरी मानून घेत असत आणि शेतकरी मानूनच त्यांनी आपल्या सर्व गोष्टी केल्या आहेत. कोल्हापुरात जी सहकारी चळवळ उभी राहिली, तिचा पाया शाहू महाराजांनी घातला होता. आजच्या परिस्थितीत समाजाला शाहूंच्या विचारांची अत्यंत गरज आहे.

# आंबा लागवड जूनमध्ये केली तर चांगले उत्पादन देईल का? वाचा सविस्तर




**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

आंबा लागवडकरण्यासाठी, पावसाळ्यापूर्वी एप्रिल-मे महिन्यात खड्डे खोदून घ्यावेत. खड्ड्यांमध्ये चांगली माती, शेणखत आणि सिंगल सुपर फॉस्फेट मिसळून ते खड्डे भरून घ्यावेत. त्यानंतर, योग्य, उत्पादनक्षम आंबा रोपांची निवड करावी, पण लागवड नेमकी केव्हा आणि कशी करावी, हे समजून घेऊयात...

आंब्याची पारंपारीक लागवड १० ् १० मीटर अंतरावर केली जाते, तर सघन लागवड ५ ् ५ मीटर अंतरावर चौरसाकृती पद्धतीने करण्याची शिफारस आहे. आंब्याची लागवड करताना ती शक्यतो पावसाळ्याच्या सुरवातीला पण पाऊस स्थिरावल्यावर करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अती पावसाच्या काळात (जुलै, ऑगस्टमध्ये) लागवड करू नये.

सूर्यप्रकाश जास्तीत जास्त कलमांमध्ये सर्वत्र पोहोचण्याच्या दृष्टीने दोन कलमांतील अंतर उत्तर-दक्षिण व दोन ओळींतील अंतर पूर्व-पश्चिम ठेवावे.

लागवडीसाठी १ १ ् १ मीटर आकाराचा खड्डा खणून त्यात चांगली माती, ४ घमेली चांगले कुजलेले शेणखत आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट यांचे मिश्रण करून खड्डा भरून घ्यावा.

सघन लागवडीसाठी कोकणात हापूसची शिफारस आहे.

त्याच बरोबरीने १० ते १५ टक्के रत्ना, आम्रपाली, मल्लिका, केसर या जातींची लागवड करावी.

रोपवाटिकेतून अधिक उंचीची कलमे घेत असताना मुळांची पिशवीत गुंडाळी झालेली नाही याची खात्री करावी.

एक वर्ष वयाची १० ् १४ इंच आकाराच्या पिशवीत वाढलेली कलमे लावावीत.

बागेला सुरुवातीपासून ठिबकद्वारे पाणी द्यावे.

त्यासाठी बुंध्यात एक व उत्तर-दक्षिण बाजूला १ फूट अंतरावर ८ लिटर प्रति तास क्षमतेचे ड्रीपर लावावेत.

आंबा लागवडीमध्ये सुरवातीच्या काळात उत्पादन मिळण्यासाठी नाचणी, वरई, तीळ, भुईमूग, भाजीपाला, कंदपिके इत्यादींची लागवड करता येते.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## रिकाम्या पोटी चावून खा 'ही' ५ हिरवी पानं, पित्ताचा त्रास होईल कमी- दुर्गंधीही येणार नाही

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

बदलेल्या जीवनशैलीमुळे खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. सतत जंकफूड, पुरेशी झोप न घेणे, ताणतणाव आणि कॅफिनचे अधिक सेवन यामुळे आपल्या शरीरावर याचा वाईट परिणाम होतो. अशावेळी आपली पचनक्रिया खराब होऊन ॲसिड रिफ्लक्सची समस्या वाढते.आम्लपित्ताचा त्रास वाढतो. अरबट-चरबट पदार्थ खाल्ल्याने शरीरात पित्तदोष निर्माण होतो.पित्ताचा त्रास वाढला की डोकेदुखी, छातीत जळजळ होणे, आंबट पाणी, उलट्या होणे आणि अस्वस्थ वाटणे यांसारख्या समस्या वाढतात. अशावेळी काही घरगुती उपाय केल्याने पित्ताचा त्रास कमी होऊ शकतो.



आपल्या रिकाम्या पोटी ५ पुदिन्याची पाने खावी लागतील. पुदिन्याची पाने आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. यामध्ये असणारे घटक पचन सुधारण्यास, डोकेदुखी कमी करण्यास मदत करतात. तसेच तोंडाची दुर्गंधी आणि त्वचेसाठी देखील फायदेशीर आहे. पुदिन्यामध्ये व्हिटॅमिन सी असते जे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते. पुदिन्यामध्ये ऍलर्जी-विरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे ऍलर्जीची लक्षणे कमी होतात.


पुदिन्याची पाने खाताना त्यामध्ये चण्याऐवढा भिमसेन कापूर घालून ५ पाने चघळून खावी. किंवा या पानांसोबत खडीसाखर खाल्ल्याने पित्ताचा त्रास कमी होतो. वारंवार त्रास देणाऱ्या पित्ताच्या त्रासकडे दुर्लक्ष करु नका कारण समस्या गंभीर होऊन आजार वाढू शकतो. ॲसिडिटी आणि अपचनाचा त्रास होत असेल तर हा उपाय करुन पाहा.

पुदिन्याची पाने खाल्ल्याने शरीराला थंडावा मिळतो. तसेच पुदिन्याची पाने पाण्यात उकळून त्यात मध किंवा लिंबू घालून त्याचा चहा प्या. इतकेच नाही तर पुदिन्याची पाने पाण्यात रात्रभर भिजवून सकाळी ते पाणी प्या. जेवणात पुदिन्याची चटणी था. असं केल्याने आपल्याला पित्ताच्या त्रासापासून आराम मिळेल.

# विदर्भातील उच्च शिक्षणाचा असमतोल विकास, नागपूर पुढे मग अमरावती मागे का? राज्य शासनाच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह

अलीकडे विदर्भाच्या विकासावर मोठी चर्चा होत आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार आल्यापासून विदर्भाचा विकास झपाट्याने होत असल्याचे चित्र आहे. याला कारण आहे विदर्भातील नागपूरच्या दोन नेत्यांचं. देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात असलेलं मोठं स्थान. गेल्या अकरा वर्षापासून केंद्रात नितीन गडकरी सलगपणे रस्ते वाहतूक विभागाचे मंत्री आहे. तर मधला महाविकास आघाडीचा अडीच वर्षाचा अपवाद वगळता देवेंद्र फडणवीस सातत्याने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आहेत. या दोन नेत्यांमुळे विदर्भातील विकासाचा अनुशेष झपाट्याने कमी होत असल्याचे चित्र आहे. मात्र, विदर्भाचा विकास होतांना तो नागपूर केंद्रित होत असल्याची मोठी ओरड आता होताना दिसते आहे. नागपूर आणि नागपूर विभाग केंद्रित विकास होत असताना राज्यात मागास प्रदेश अशी ओळख असलेल्या अमरावती विभागातवर मात्र विकासाच्या बाबतीत मोठा अन्याय होतांना दिसते आहे. मेट्रो, रेल्वे, रस्ते, पायाभूत सुविधा, मोठे प्रकल्प, उद्योग आणि शैक्षणिक संस्था हे सर्व नागपूर आणि नागपूर विभागात येतांना दिसत आहेत.

मात्र, या सर्वांच्या बाबतीत अमरावती विभागावर सातत्याने अन्याय होत असल्याचे चित्र आहे. अमरावती विभागात अमरावतीसह अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. या पाचही जिल्ह्यांची ओळख राज्यात मागास जिल्हे अशी आहे. तर अमरावती विभागातील वाशिम आणि बुलढाणा हे राज्यातील अतिमागास जिल्हे समजले जातात. असं असतानाही अमरावती विभागात गेल्या अकरा वर्षात कोणताही मोठा प्रकल्प किंवा मोठे उद्योग आलेले नाहीत. त्यामुळे विदर्भाचा विकास म्हणजे फक्त नागपूरचा विकास का?, असा प्रश्न आता पश्चिम विदर्भातील जनता सरकारला विचारत आहे. दोन्ही विभागातील प्रादेशिक असमतोलाची दरी ही दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. त्यामुळे पुढच्या काळात विदर्भाचा विकास होत असतांना तो फक्त नागपूर विभागाचा विकास होत आहे, असं दुर्दैवी चित्र निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




**दोन्ही विभाग सारखे, पण विकासात असमतोल** - विदर्भाचे दोन प्रशासकीय विभाग पडतात. नागपूर (पूर्व विदर्भ) आणि अमरावती (पश्चिम विदर्भ) विभाग. हे दोन्ही विभाग. भूगोल आणि लोकसंख्येच्या बाबतीत जवळपास सारखेच आहेत. नागपूर विभागाचे क्षेत्र ५१,३७७ चौ. किमी. आणि लोकसंख्या १.१७ कोटी, तर अमरावती विभागाचे क्षेत्र ४६,०२७ चौ. किमी. आणि लोकसंख्या १.१२ कोटी इतकी आहे. पण उच्च शिक्षणाच्या विकासाच्या बाबतीत नागपूर विभाग अनेक पावलं पुढे आहे, आणि पश्चिम विदर्भ मात्र मागेच राहिलेला दिसतो.

**विदर्भात विद्यापीठांचे जाळे, पण केंद्रबिंदू एकाच विभागात!**- विदर्भात एकूण ६ सार्वजनिक विद्यापीठे आणि एक केंद्रीय विद्यापीठ आहेत. त्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली), कालिदास संस्कृत विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि माफसू विद्यापीठांचा समावेश होतो. वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ हे केंद्रीय विद्यापीठ महाराष्ट्रात एकमेव आहे.

**नागपूरला 'राष्ट्रीय' दर्जा, अमरावतीची उपेक्षा** - नागपूरमध्ये आज खालीलप्रमाणे राष्ट्रीय दर्जाच्या संस्था कार्यरत आहेत:

IIM² (Indian Institute of Management)

VNIT (Visvesvaraya National Institute of Technology)

-IIMS (-ll India Institute of Medical Sciences)

NIPER (Pharmaceutical Education and Research)

IIIT, NPTI, N-DT, MNLU, सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी,

या सर्व संस्था नागपूर शहरात केंद्रित आहेत. दुसरीकडे, अमरावती विभागात एकमेव 'राष्ट्रीय' दर्जाची संस्था म्हणजे इंडियन इन्स्टिटच्यूट ऑफ मास कम्युनिकेशन (खखचउ). ती सुद्धा अद्याप स्वतंत्र इमारतीविना आहे.

**इतिहासातील लढ्याचा वारसा, अकोल्यातील शहीद विद्यार्थी**- १९६० च्या दशकात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोल्यात स्थापन करण्यासाठी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठा संघर्ष केला. १७ ऑगस्ट १९६७ रोजी झालेल्या आंदोलनात ९ विद्यार्थ्यांना गोळीबारात आपले प्राण गमवावे लागले. शेवटी २० ऑक्टोबर १९६९ रोजी अकोल्यात कृषी विद्यापीठ स्थापन झाले.

काही वर्षांपूर्वी या विद्यापीठाच्या विभाजनाचा प्रयत्नही झाला होता. तो यशस्वी झाला नाही, हेच या विभागाच्या उण्यापुरत्या शैक्षणिक अस्तित्वाचे रक्षण झाले, असे म्हणावे लागेल.

**वैधानिक विकास मंडळांच्या समाप्तीमुळे धोरणात्मक नुकसान**

एकेकाळी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अंतर्गत, राज्यपाल हे विदर्भ व मराठवाड्यासाठी स्वतंत्र निर्देश देण्यास अधिकृत होते. पण आता वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात नसल्याने, राज्यपालांकडे त्या अधिकारांची अंमलबजावणी करण्याची क्षमता उरलेली नाही.

**अभ्यासकांचे मत : प्रादेशिक असमतोल दूर करा**- विदर्भ विकास अभ्यासक व माजी तज्ज्ञ सदस्य डॉ. संजय खडक्कार यांनी सांगितले की, पश्चिम विदर्भात खखच्, -खखचड, छडण यांसारख्या संस्था स्थापन झाल्यास केवळ शिक्षणच नव्हे, तर आर्थिक व सामाजिक विकासालाही गती मिळेल.

अमरावती विभागात रोजगारनिर्मितीच्या संधी नाहीत, कारण उच्च शिक्षण, तंत्रज्ञान, उद्योग यांचा अभाव आहे. येथेही खखच्, खखखढ, -खखचड, छडण यासारख्या संस्था उभ्या राहिल्या पाहिजेत. यामुळे युवकांना स्थानिक संधी मिळतील आणि स्थलांतर कमी होईल. असं मत डॉ. संजय खडक्कार यांनी व्यक्त केलं आहे. ते पुढे म्हणाले, जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार, प्रादेशिक विषमता १०% ने कमी केल्यास देशाच्या ऋझ्झ मध्ये १.५% वाढ होऊ शकते. हे लक्षात घेऊन पश्चिम विदर्भावर लक्ष देणे आज गरजेचे आहे.

**विकासासाठी धोरणात्मक पावले आवश्यक**

- अमरावती, अकोला, यवतमाळमध्ये नवे राष्ट्रीय दर्जाचे शिक्षणसंस्था स्थापन करणे
- उद्योग व हवाई सेवा यांचा विकास
- तंत्र शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षणाचा विशेष फोकस
- वैधानिक विकास मंडळांची पुनर्बहाली
- इमारती, हॉस्टेल्स व स्कॉलरशिप्ससाठी स्वतंत्र निधी

# राज्यातील वीज ग्राहकांना सरसकट दिलासा


## घरगुती ग्राहकांसोबत औद्योगिक आणि व्यावसायिक वीजदरात कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-**

राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला आणि आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत.

राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे.

वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महत्त्वाकांक्षी योजना उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अंमलात येणाऱ्या या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करून त्यावर पंप चालविण्यात येणार आहेत. या योजनेची क्षमता सोळा हजार मेगावॅट इतकी असेल व त्या माध्यमातून सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या



कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज ध्यानात घेऊन रिसोर्स डेक्सी प्लॅन तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २६ जून २०२५

शहर/ग्रामिण




# भारतीय संविधानच सर्वोच्च: सरन्यायाधीश भूषण गवई

## अमरावतीचे सुपुत्र व देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा हृदय सत्कार





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ अमरावती–** बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान दिलं आणि त्या संविधानाचे जे मूल्य आहेत त्या मूल्यांनुसार कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. नेहमी वाद होत असतो की कोण सुप्रिम आहे. काही जण म्हणतात संसद सर्वोच्च आहे, पण खऱ्या अर्थाने या देशाचे कायदेमंडळ, न्यायपालिका, कार्यपालिका नव्हे तर केवळ भारताचे संविधान हेच सर्वो च्च आहे आणि त्या अंतर्गत विविध शाखा कार्य करीत असतात, असे मत भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले.

अमरावती जिल्हा वकील संघातर्फे पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल गृपच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

मी वकिल म्हणून आणि न्यायमूर्ती म्हणून जे काम केलंय हे सगळं आपल्यासमोर आहे. मी ज्यावेळेल सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश झालो, तेव्हा पत्रकारांनी मुलाखत द्यायची इच्छा व्यक्त केली, पण

मुलाखत दिली नाही. कारण की मला सुरुवातीला खूप जास्त अपेक्षा वाढवायच्या नव्हत्या. यापूर्वी अनेक उदाहरणे बघितली की, मी हे करणार आहे, मी ते करणार आहे आणि नंतर कालखंड संपतो. त्यामुळे सांगितले की, मी एवढेच अभिवचन देईल की मी जे शपथ घेतली आहे, त्या शक्तीप्रमाणे माझ्या योग्यतेनुसार आणि माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला जे मान्य होईल, भारतीय राज्यघटना, भारताच्या राज्यघटनेंतर्गत केलेले कायदे, त्यानुसार मी माझं कार्य करण्याचा प्रयत्न करेल. माझ्या प्रत्येक जजमेंटमध्ये जिथे सामाजिक आणि आर्थिक समानतेचा प्रश्न येतो,यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. विदर्भातल्या नागपूर प्र–प्रदेशात झुपी जंगलाचा एक मोठा प्रश्न आहे. त्याबद्दल मागच्या महिन्यात निर्णय त्या वेळेला मी राईट टू शेल्टर, राईट टू लाइव्हहुड याचा आधार घेऊन जे लोक वर्षानुवर्षे घरात राहताहात, जे लोक वर्षानुवर्षे आपली शेतीवरती निर्वाह करताहेत, त्यांच्या अधिकारावरती गदा आणता येणार नाही, असा निर्णय दिल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सांगितले. मुंबई उच्च न्यायालयात होतो त्यावेळेला पूर्ण वाचून जायचं होतं. पण नंतर बोबडे साहेबांनी म्हटलं की तू वाचून जा, दुसरे साहेब म्हणाले की लोकांची अशी कंप्लेंट आहे की तू प्री डिटरमिन होऊन जातोय. म्हणून. २०१० पासून वाचणं थोडं कमी केलं होतं. पण सुप्रीम कोर्टात वाचल्याशिवाय जमत नाही. त्यादरम्यानचा त्यांनी मुलाचा एक कौटुंबिक किस्सा सुद्धा भाषणात सांगितला. पहिल्या दिवशी ज्यांच्यासोबत मी बसलो होतो, मुलगा कोर्टात बसला असता त्याने ते बघितलं की काय होतंय तिथे. न्यायाधीशाचा जीवन म्हणजे फार कठीण असते. लोकांना बाहेरून खूप सोप वाटतं, असे सांगत त्यांनी कुटुंबीयांचा ऋणी असल्याचे सांगितले.

वकिलीमध्ये जोपर्यंत तुमचा जम बसत नाही तोपर्यंत सुरुवातीचा कालखंड हा फार कठीण असतो. त्या कालखंडामध्ये अनेकांनी सपोर्ट केला. त्यापैकी काही हयात नाहीत, पण त्यांचे कुटुंबीय उपस्थित आहे, याचा आनंद आहे. अमरावती बार तर हा नेहमी प्रगल्भ राहिलेला आहे, असे गौरवोद्गार सरन्यायाधीशांनी काढले. या कार्यक्रमाला उपस्थित न्यायिक क्षेत्रातील मान्यवरांचा तसेच कुटुंबातील आजी, आजोबा, वडील, काका, बहिण भाऊ, आतेभाऊ, मामेभाऊ व अन्य नातेवाईक, मित्रांचा आवर्जून नामोल्लेख केला. वकीली करताना ज्यांचा संपर्क आला त्यांचाही सरन्यायाधीशांनी भाषणात उल्लेख केला. सुप्रीम कोर्टाचा जज झालो त्यावेळेला दोन आत्या होत्या. बघा आमचे जे एकत्र कुटुंब आहे, त्या सर्व कुटुंबीयांचा नेहमी सपोर्ट राहिलेला आहे, मित्रमंडळींचा सपोर्ट राहिलेला आहे. माझी अर्धांगिनी डॉ. तेजस्विनी या सर्वांचे सहकार्य लाभल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेला अभिप्रेत असलेल्या आर्थिक सामाजिक न्यायाच्या प्रती या देशाची जी संवैधानिक मूल्ये समता, समानता आणि बंधुत्व याप्रती माझी बांधिलकी राहील. माझ्या हातून अमरावतीकरांना अभिमान वाटेल, असंच कार्य होईल. अशा आशीर्वाद द्या, अशी विनंती भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सत्काराला उत्तर देताना केली.सर्वांचा मी ऋणी आहे परंतु या प्रसंगी आपले आभार मानणार नाही. कारण आभार मानायचे कोणाचे ? आभार दुसऱ्यांचे मानायचे असते. आपण तर आपलेच आहोत. ह्याच मातीतले आहोत. आपण सगळं अंबानगरीचे पुत्र आहोत आणि अंबानगरीने, अंबानगरीच्या नागरिकांनी, अंबानगरीच्या सर्वांनी जो प्रेमाचा वर्षाव केलेला आहे, त्या वर्षावात मी भिजून राहू इच्छितो आणि या प्रसंगी फक्त आपल्याकडून एक आशीर्वाद मागू इच्छितो की यापुढचा जो माझा कालखंड ह्या न्यायदानाचा, तोही कालखंड आतापर्यंत जो बावीस वर्षांचा गेला, त्याचप्रमाणे माझ्या हातून सेवा व्हावी, असे सांगत त्यांनी आभाराचे भार कशाला, सत्काराचे हार कशाला, राहू द्या एकमेकांच्या मनात, त्या घरट्याला दार कशाला, या कवितेच्या ओळीने त्यांनी भाषणाची सांगता केली. तत्पूर्वी, जिल्हा वकील संघातर्फे ॲड. सुनिल देशमुख पांच्यासह कार्यकारिणीने सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, दादासाहेब पवई यांचा अर्धाकृती पुतळा शॉल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार केला. ॲड. वासुदेव नवलानी, ॲड. डब्ल्यू ए. मिर्झा, ॲड. श्रीकांत देशपांडे भादींनी सन्मान केला. ॲड, सर्जेराव घुरडे, ॲड.जिल्हा वकील संघाचे सदस्य उपस्थित होते.

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी केली कचरा संकलन केंद्राची पाहणी







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी आज सकाळी कचरा संकलन केंद्र फ्रेजरपुरा, सुकळी कंपोस्ट डेपो आणि गुलिस्तान नगर परिसराची पाहणी केली. स्वच्छ अमरावतीसाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन करत आयुक्त सौम्या शर्मा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचनाही दिल्या.

फ्रेजरपुरा परिसरातील कचरा तातडीने कमी करण्याचे आदेश देतांना त्यांनी सांगितले की, नागरिकांना त्रास होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. रस्त्यावरील कचरा त्वरित हटवावा आणि कंटेनरमधून कचरा पडणार नाही याची काळजी घ्यावी. प्लास्टिक गोळा करून रस्त्याच्या दोन्ही बाजू स्वच्छ ठेवाव्यात. तसेच दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे पुनर्वापर व पुनर्निर्मिती करून शेतकऱ्यांना सेंद्रिय खत उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

सुकळी कंपोस्ट डेपोच्या कार्यपद्धतीची पाहणी करतांना आयुक्तांनी सांगितले की, येथे कार्यक्षमतेने कचरा प्रक्रिया होऊन नागरिकांना दिलासा मिळावा. अमरावती महानगरपालिकेचा हा शास्त्रोक्त घनकचरा प्रक्रिया प्रकल्प देशात आदर्श ठरावा, यासाठी आवश्यक ते उपाय करावेत.

घनकचऱ्याचे वर्गीकरण नागरिकांकडून कचरा तयार होताना व्हावे, यावर भर देतांना आयुक्तांनी नमूद केले की, ओला व सुका कचरा वेगवेगळ्या डब्यात टाकणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. प्रकल्पस्थळी वर्गीकरणासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांवर ताण येऊ नये, यासाठी प्रत्येकाने घरातच योग्य पद्धतीने कचरा टाकावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रकल्पस्थळी वापरल्या जाणाऱ्या बायोकल्चर फवारणी, विंड्रो पद्धत आणि तयार होणारे सेंद्रिय खत याचे व्यवस्थित नियोजन करून त्याचा उद्यान व शेतीमध्ये जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करावा, असे सूचित केले. नागरिकांमध्ये एकल वापर प्लास्टिकविरोधात अधिक प्रभावी जनजागृती करावी, असा आदेशही त्यांनी दिला.

'शून्य कचरा' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी झोननिहाय कचरा संकलन केंद्र सुरू करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले.


गुलिस्तान नगर परिसराची पाहणी करतांना सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करून आयुक्त सौम्या शर्मा यांनी सांगितले की, साफसफाई ही एक सामूहिक जबाबदारी आहे. सर्वांनी मिळून आपल्या परिसरात स्वच्छता राखणे आवश्यक आहे. त्यामुळे आरोग्य सुधारते आणि जीवनमान उंचावते.

या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, नितीन बोबडे, अभियंता राजेश आगरकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, कुंदन हडाले, शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक, कंत्राटदार प्रतिनिधी व इतर मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# उपायुक्तांच्या ॲन्टी चेंबरचे छत कोसळले

## ९६ वर्ष जुनी झाली मनपाची इमारत





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती–** एकीकडे शहरातील अतिशिकस्त इमारतींना खाली करण्याची नोटिस देता देता महापालिकेचे अधिकारी त्यांच्याच इमारतीला नोटिस देण्याचे विसरले की काय, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. महापालिकेच्या ९६ वर्ष जुन्या इमारतीचे छत कित्येकदा कोसळले परंतु या इमारतीमधील उपायुक्तांचा कक्ष हलविण्यात आलेला नाही. तीन–चार दिवसापासून सुरु असलेल्या रिमझीम पावसामुळे उपायुक्त मेघना वासनकर यांच्या ॲन्टी चेंबरचे छत अचानक कोसळले. यामुळे कक्षातील साहित्याची नासधुस झाली. यापूर्वी उपायुक्तांच्या मुख्य कक्षाला गळती लागली व छत कोसळले होते. त्यामुळे उपायुक्त मेघना वासनकर यांचा कक्ष बदलविण्यात आला. महापालिकेची इमारत जीर्ण झाल्याने आता या इमारतीचा भाग कोसळायला लागला आहे. उपायुक्त मेघना वासनकर यांच्या ॲन्टी चेंबरचे छत दोन दिवसापूर्वी अचानक कोसळले. छत कोसळल्यामुळे या

कक्षात असलेल्या साहित्याचे नुकसान झाले मात्र कुठल्याही प्रकारची जिवीत हानी झाली नाही. छत कोसळल्यानंतर मनपा शहर अभियंता रवींद्र पवार यांच्या सह उपअभियंत्यांनी त्यांच्या कक्षाची पाहणी केली. ही इमारत अंत्यत जीर्ण झाल्यामुळे

त्याशिवाय कक्षाच्या स्लॅबवर पावसाचे पाणी साचत असल्याने ते छत जीर्ण झाल्याचे दिसून आले. इमारतीच्या भितीमध्ये झाडे उगवलेली असून झाडांची मुळे खोलवर गेलेली आहेत. छत कोसळल्यानंतर उपायुक्तांनी त्यांचा कक्ष हलविला.

# रेल्वे धुळघाट ते राणी मार्गावर अपघात खासगी बस पलटी, अनेक जखमी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६धारणी,** – अकोट ते धुळघाट मार्गे राणीगाव येत असलेल्या एका खासगी बसला भीषण अपघात झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले असून यापैकी एका प्रकृती गंभीर आहे. धुळघाट ते राणागाव रस्ता सामाजिक बांधकाम विभाग, राज्य परीवहन विभाग आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडून मोटारी किंवा बड्या वाहनांसाठी प्रतिबंधित आहे, हे विशेष.अकोट – धुळघाट, राणीगाव ते गोलाई पर्यंत एक खासगी बस नेहमी चालते. बुधवारला अकोट येथून राणीगाव कडे येत असताना घाट वळणात चालकाचा ताबा सुटल्याने बस पलटी झाली. या अपघातात बसमधील अनेक प्रवासी जखमी झाले. जखमींना रेल्वे धुळघाटच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारार्थ भरती करण्यात आले आहे.प्राप्त माहितीप्रमाणे बुधवारला सायंकाळच्या सुमारास रेल्वे धुळघाट ते राणीगाव दरम्यान खासगी बस पलटी झाली. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले. राणीगाव, गोलाई, मोथा, सिनबन आणि कंजोली येथील प्रवाशी या बसमध्ये असल्याची माहिती आहे. एमएच १ / डीटी ५४२९ क्रमांकाची खासगी बस नेहमी अकोट ते गोलाईचा प्रवास करत असते. तर क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी नेहमी प्रवास करतात. सुदैवाने दाल्त प्रवाश्यांना मार लागला नाही. गेल्या वर्षी सेमाडोह जवळ खासगी बस पलटून सात प्रवाशांचा मृत्यू झाला होता.

# गिट्टी खदानीतून गौण खनिजाची जीवघेणी वाहतूक




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मोर्शी–** मोर्शी तालुक्यातील दाभेरी येथील गिट्टी खदानीतून गौण खनिजाची जीवघेणी वाहतूक अजूनही सुरूच महसूल विभाग व आरटीओ विभागाचे दुर्लक्ष. निष्काळजीपणाने गौण खनिजाची वाहतूक करत असताना एखाद्या दगड पडून मोठा अपघात झाल्यावरच अशा वाहनावर कारवाई करणार का?

बऱ्याच ठिकाणी ओव्हरलोड वाहतुकीवर प्रशासनाकडून कारवाई केल्या जाते तर त्याच वेळी सर्व नियम पायदळी तुडवून मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा, कापूस तळणी, तसेच दाभेरी या ठिकाणी असलेल्या खदानीतून दररोज ओव्हरलोड दगडाची जीवघेणी वाहतूक मोर्शी तालुक्यातून चांदूरबाजार, अचलपूर तीन तालुक्यात ओव्हरलोड गौण खनिज वाहनाद्वारे पोहोचविण्यात येते अशातच तालुक्याच्या ठिकाणी तसेच मुख्य मार्गावर वाहतूक पोलीस सुद्धा कारवाई करता रस्त्यावर असतात परंतु त्यांच्या नजरेसमोरून अशी वाहने धावतात कारवाई मात्र शून्य असते. त्यामुळे नियम फक्त सर्वसामान्यांनाच काय असा प्रश्न परिसरातील नागरिकांना पडला असुन प्रशासन मात्र या कामी वेळ काढू धोरण अवलंबत असल्याचा आरोप परिसरातील नागरिकांद्वारे करण्यात येत आहे. त्याचबरोबर आता प्रशासन काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे उत्खनन करत असताना जमिनीच्या पृष्ठभागापासून खोली सहा मीटर पेक्षा जास्त नसावी उत्खननाकरिता ब्लास्टिंग करून गौण खनिज काढता येत नाही व सूर्यास्त नंतर गौण खनिजाची वाहतूक करता येत नाही असे असताना मात्र सर्व नियम धाब्यावर बसून हा प्रकार सुरू आहे.

# मोर्शीत चाकूच्या धाकावर फायनान्स कर्मचाऱ्यांना लुटले

## १३.८ लाखांची रोकड घेऊन लुटारू पसार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मोर्शी –** फायनान्स कंपनीची रक्कम बँकेत भरायला जाणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना शहरातील सेंट्रल बँक शाखेनजिक बुधवारी (ता. २५.) भरदुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली. चोरट्यांनी १३ लाख ८ हजार ७२० रुपये लुटून नेले. लागोपाठ घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील कॉलनी परिसरात क्रेडिट ऍसेस मायक्रो ग्रामीण प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची शाखा असून यामध्ये ग्रामीण भागातील गटाकडून पैसे वसूल करतात व ती रक्कम मोर्शीच्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत जमा करतात.नेहमीप्रमाणे बँकेतील कर्मचारी शुभम गुणवंत म्हस्के (वय २५) व सुंदर शालिकराम धिकार (वय २८) हे (एमएच २७ डीडी ५०४१) क्रमांकाच्या दुचाकीने अंदाजे दुपारी तीन वाजताच्या दरम्यान कंपनीची १३ लाख ८ हजार ७२० रुपये जमा रक्कम मोर्शीच्या भारतीय स्टेट बँकमध्ये जमा करण्यासाठी जात होते. दरम्यान मुख्य रस्त्यावर असलेल्या सेन्ट्रल बँकेसमोर मागून आलेल्या पल्सर गाडीवरील एकाने त्यांच्या दुचाकीला धक्का देऊन पाडले व ते पडल्यानंतर त्यांना चाकू दाखवून त्यांच्या गाडीची चाबी व पैशाची बॅग घेऊन पलायन केले. यामध्ये दि.२४ व २५ जूनची जमा केलेली रक्कम असल्याचे समजते. या अगोदर शहरात १८ जून रोजी क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून दोन अज्ञात चोरट्यांनी श्यामसुंदर राधाकिसन बंग यांची सोन्याची अंगठी व गोफ असा दोन लाखांचा ऐवज हात सफाईने लंपास केल्याची घटना घडली होती. या घटनेप्रकरणी मोर्शी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास आरंभीला आहे.

# राज्याची कुपोषणमुक्त पार्किंग वाटचाल - मुख्यमंत्री

## अति कुपोषित बालकांचे प्रमाण निम्म आणण्यात यश

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६मुंबई –** राज्याच्या ग्रामीण व शहरी कुपोषणमुक्त राज्य शासन करत आहेत. गेल्या दोन वर्षात कुपोषित बालकांचे प्रमाण घटत असल्याचे निदर्शनास आले आहे. मध्ये अतिव्रे कुपोषित बालकांचे प्रमाण १.९३ ते ०.६१ उत्तरांवर आले आहे. तर कुपोषित बालकांचे प्रमाण ५.९ ते ३.१ ३.११ वरवरवर आले असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षभरात अति कुपोषित बालकांची संख्या निम्म्यावर आली आहे.

राज्याची कुपोषणमुक्ती सुरूच ही वाटचाल , राज्याच्या विविध विभाग , शक्तीच्या समन्वयाचा प्रयत्न , संवादाची फलश्रुती असल्याचे मुख्यमंत्री गंभीर यांनी म्हटले आहे. या मुख्यस्तरासाठी या यंत्रणेतील विविध अधिकारी , घटकांचे , क्षेत्रीय वरचेवर काम सर्वांचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र हे विविध अग्रेसर राज्य आहे. सामाजिक न्यायाने राज्याने अनेक महत्त्वपूर्ण आणि लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. मनाने मानव विकास आणि समाजातील सर्व घटक कल्याणकारी योजनांचे आयोजन महाराष्ट्र अग्रेसर योजना , हे देखील आपल्या सर्वांसाठी गौरवास्पद असल्याचे , मुख्यमंत्री श्री. गांधी यांनी म्हटले आहे.

जिल्हा कुपोषणमुक्ती उपक्रम राबवत आहेत. गेल्या वर्षी महिला व बालकांसाठी केंद्र शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबविले गेले. त्यामुळे कुपोषण प्रमाण कमी आहे. कुवतीच्या अनुषंगाने केलेल्या वर्षानुवर्षे निहाय वजन व सर्वेक्षण सर्वेक्षणात कमालीची बालकांची संख्या पुढीलप्रमाणे मार्च अशी ४ - २०२३ मध्ये लाख , ६७ हजार १८० , सन २०२४ - ४२ लाख ६२ हजार ६५२ , सन २०२५ - ४८ लाख १० हजार ३०२. अति अतितीव्र कुपोषित बालकांची संख्या मार्च २०२३ अखेर ८०,२४८ (१.९३%) एवढी होती , ती मार्च २०२४ अखेर ५१,४७५ (१.२१%) एवढी होती. तर मार्च २०२५ शेवटचे प्रमाण २९,१० (०.६१) संख्या कमी आहे. अनुक्रमे २,१२,२०३ (५.०९%) , १,६६,९९८ (३.९२%) आणि १,४९,६१७ (३.११%) अशी अनुक्रमे



२,१२,२०३ (५.०९%) आणि १,४९,६१७ (३.११%) अशी संख्या आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रभावीपणे बाल विकास केला जात आहे. यांतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके , गरोदर महिला व स्तनदा मातांना नियमीत पूरक आहार दिला जात आहे. ६ वर्ष ते ३ वर्ष वयोगटातील बालके , गरोदर महिला व स्तनदा माता यांना घरपोच आहार (टीएचआर) , ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताज आहार (एचसीएम) दिला जातो.

आदिवासींना भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहारअन्तर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार दिला जातो. ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना केळी , अंडी दिली जात आहेत. तसेच अतितीव कुपोषित ( एसएएम) बालकांसाठी ग्रामविकास केंद्र सुरू करण्यात आले असून तेथे बालकांना तीन आहार आवश्यक आहार आणि आरोग्य सेवा जात आहेत. की धरतीवर नागरी जगरी अतितीवर कुपोषित बालकांसाठी नागरी बाल विकास केंद्र सुरू करण्यात आले आहेत. पोषण एकात्मिक बालविकास सेवा लाभार्थ्यांचे पोषण ट्रॅकर पच्या पार्किंग संनियंत्रण केले जात आहे. लाभार्थींना १०० टक्के पूरक पोषण आहार देणे , बालकांची वजन उचलणे व उंचावर देखरेख करणे ट्रॅकवर अचूक नोंद करणे , कुपोषित घरातील बालकलाकार : लक्ष पुरुष करणे तसेच १०० टक्के उद्दिष्ट , क्षेत्रीय चे अंगणवाडी स्तरावर सूक्ष्म नियंत्रण हे परिणामकारक आहे. स्थानिक कुपोषण कमी करण्यासाठी टास्क फोर्स गठीत करण्यात आले असून त्यांच्या शिफारशींनुसार कार्यवाही केली जात आहे. योजना आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय यंत्रणांचा अहवाल प्रकाशित केला जात आहे. क्षेत्रीय तुमची क्षमता बांधणी , अंगणवाडी सेविका व मदतनीस नियम प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करताना हा सकारात्मक घडवून आणला आहे.

# शेतकऱ्यांकडून विरोध:नोटीस न बजावता अतिक्रमण काढण्यासाठी धडकले पथक, उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली धाव

> शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेल्या जमीनीवर ते शेती करीत आहे. मात्र हे अतिक्रमण काढुन जमीन कंपनीला देण्याचा घाट घालण्यात येत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांवर दडपशाही करण्यात येत आहे. ही दडपशाही शिवसेना कधीही खपवुन घेणार नाही. शेतकऱ्यांच्या या लढ्यामध्ये आम्ही त्यांच्यासोबत भक्कमपणे उभे आहोत. **– किशोर इंगळे,** जिल्हाप्रमुख, उबाठा.

*विदर्भ प्रजासत्ताक*
***दि.२६यवतमाळ–***
*तालुक्यातील साकूर येथे काही शेतजमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमण धारकांना कुठलीही नोटीस न बजावता सोनर कंपनीचे अधिकारी, पोलिस पथकासह आले असता अतिक्रमण धारकांनी त्यांना विरोध केला. बुधवारी दि. २५ जून रोजी दुपारी घडलेल्या या घटनेची माहिती मिळाल्याने शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी धाव घेतली. त्यानंतर मात्र काही काळ तनावाचे वातावरण निर्माण झाले होते.*

*तालुक्यातील मांगूळ गावापासून काही अंतरावर असलेल्या साकूर हेटभ या गावामध्ये महसुल विभागाच्या जमिनीवर सौरउर्जा प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या जमिनीवर या परिसरातील ११ शेतकऱ्यांचे गेल्या ५० वर्षापासून अतिक्रमण आहे. हे शेतकऱ्यांचे अतिक्रमण काढण्यासाठी संबंधीत कंपनीचे अधिकारी मोठा पोलिस फौज फाटा घेवुन त्या ठिकाणी गेले होते. मात्र हे अतिक्रमण काढण्यासंदर्भात कुठलीही नोटीस मिळाली नाही असे सांगत शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला. यावेळी शेतकऱ्यांवर दबाव टाकण्यात येत असल्याची माहिती*



*मिळताच शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख किशोर इंगळे आणि प्रवीण शिंदे यांनी त्या ठिकाणी धाव घेतली. साकूर हेटी येथे जावुन त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून प्रशासनाच्या या कारवाईला विरोध केला. कुठल्याही नोटीसविना जमीन खाली करता येणार नाही, असे ठणकावून सांगितले. त्यामुळे काहीवेळासाठी गावात चांगलाच तणाव निर्माण झाला होता. दंगल नियंत्रक पथकातील कर्मचारी रस्त्यावर उतरल्यामुळे प्रकरण चिघळण्याची शक्यता होती. परंतु शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांनी केलेला विरोध लक्षात घेता कंपनीच्या कर्मचाऱ्यांसह पोलिसांनी माघार घेतली.*

# दर्यापूर व खल्लारमध्ये केबल चोरी करणारी टोळी जेरबंद

## १२ आरोपी अटकेत, ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६ दर्यापुर**
अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर व खल्लार परिसरात विजेच्या वायर व शेतातील केबल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रामीण) पोलिसांनी १२ आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून सुमारे ९७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दर्यापूर पोलीस ठाण्यात फिर्यादी नितीन थोर यांनी तक्रार दिली होती की, कंपनीने गायवाडी ते माहुली दरम्यान टाकलेल्या ३१.५ किलोमीटरपैकी १२.५



किलोमीटर ॲल्युमिनियम वायर चोरीला गेली. या तारांची किंमत ५.२६ लाख रुपये होती. दुसऱ्या प्रकरणात खल्लार येथे सुभाष सोळंके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यासह अन्य १४ शेतकऱ्यांच्या शेतातील एकूण १३१० फूट केबल चोरीला गेली. तपासादरम्यान पोउपनि. नितीन इंगोले यांच्या पथकाला माहिती मिळाली की, दिनेश चव्हाण व सागर उर्फ गोलू गुल्हाने (रा. दर्यापूर) यांनी टोळी बनवून चोरी केली. चौकशीनंतर त्यांनी गुन्हाची कबुली दिली. त्यांच्या सांगण्यावरून एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली. यामध्ये माल खरेदी करणारे तीन जण – गजानन खरले (बनोसा), शेख वसीम (अमरावती) व विशाल चव्हाण (हिवरा) यांचा समावेश आहे. या टोळीकडून दुचाकी, सहा मोबाईल, आणि कॉपर केबल असा एकूण ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे एकूण ७ चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा झाला. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# औद्योगिक उत्पादन उतारा महाराष्ट्राची यशस्वी वाटचाल

## – राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६मुंबई –** जगाच्या भागांत युद्ध आणि संघर्ष सावट आहे , मात्र पीएम नरेंद्र मोदी यांचा संवाद भारत विकास केंद्रस्थानी वाटचाल करत आहोत आणि आपण अनेक औद्योगिक आणि आर्थिक प्रगती करत आहोत , हे अत्यंत प्रशंसनीय बाब आहे , असे प्रतिपादन राज्यपाल आहे. सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.



बीकेसी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ( एमआयडीसी) यांच्या लोकशाहीने आयोजित राष्ट्र उद्योग संवाद २०२५ या भव्य औद्योगिक परिसंवादाचे उद्घाटन राज्यपाल प्रमुख महानगरात जिओवेशन सेंटर येथे आले , संपूर्ण राज्यपाल बोलले होते.

कार्यक्रमास मुख्यमंत्री उद्योजक उद्योग. , उपमुख्यमंत्री यानाथ विकास , आणि डॉ सामंत , पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल , उद्योग सचिव पी .अब्दलगन मंत्री , उडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू , मुख्यमंत्री तसेच महाराष्ट्रातील एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यपालांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रांताचा उल्लेख केला आहे गौरवोद्गार काढले.

राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याचा उल्लेख करताना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले , महाराष्ट्राच्या देशाडीपीमध्ये १४ टक्के अधिक प्रमाणात रक्कम आकाराचे औद्योगिक राज्य आहे. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राने १.६४ लाख कोटींच्या परकीय गुंतवणुकीसह भारतातील एकूण एफडीआयपैकी ४० टक्के वाटा शोधला आहे. महाराष्ट्र स्टार्टअप्सचे केंद्रस्थान आहे , सांगतो काही पूर्वी स्टार्टअप उद्योजकांबद्दल लोक भेटींचा उल्लेख केला आहे. ते भारतीय राजकारणी कौशल्यावर विश्वास व्यक्त करतात , अनेक विकसित देश निर्यात करणारे कुशल मनुष्यबळ पूर्तीसाठी पाहत आहेत.

पेट्रोली जर्मन, जपानी, चिनी, पोर्तुगीज , बदल , त्यांना आदि भाषा शिख विविध कार्यक्रम घडवणे शक्य होईल. या न्यायाने आपण युनिव्हर्सिटी परकीय स्थैर्य कायमस्वरूपी सुरू करण्याचे संकेत दिले आहेत.

राज्यपाल राकृष्णन की , विकास बंदर आणि नवी मुंबई नियंत्रण शांतता म्हणाला, महाराष्ट्राचे जागतिक व्यापार बलकट होणार आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम - डावोस २०२५ मध्ये महाराष्ट्रात १५.७२ लाख कोटी सामंजस्य करार ( एमओयू ) वर स्वाक्षऱ्या करत १५ लाख जोडण्याचा मार्ग उघडला. महाराष्ट्रातील ८२.६३ लाख एमएसएमई ही भारतातील सर्वात मोठी टेक्निकल टेक्सटाईल्ससाठी सुरू झाले ' महाराष्ट्र टेक्निकल टेक्सटाइल्स मिशन ' राज्याच्या नवकल्पनात्मक बाबींचे पाऊल आहे.

विकसित महाराष्ट्र आपण सर्वांनी पावती टाकली आहेत. उद्योग व्यवसाय, आणि सर्व सहभागींच्या सहभागातून आपण हे लक्ष्य ठरवू शकतो , असे सांगू शकतो .

# छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा चिखलीत उभारणार

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६चिखली–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा लवकरच चिखली शहराच्या मध्यवर्ती चौकात उभारण्यात येणार आहे. सध्या या जागेवर असलेला १९८५ साली स्थापन करण्यात आलेला पूर्णाकृती पुतळा हटवून त्याजागी नव्या पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर बुधवार, २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पुतळा हलवण्याच्या कार्यवाहीला विधिवत प्रारंभ होणार आहे. यावेळी तहसीलदार संतोष काकडे, नगरपालिका मुख्याधिकारी प्रशांत बिडगर, चिखली पोलिस स्टेशनचे ठाणेदार संग्राम पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता दीपक चिंचोले तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. नवीन अश्वारूढ पुतळ्याची उंची १५ फूट असून वजन अंदाजे २२०० ते २३०० किलोग्रॅम इतके आहे. संपूर्ण पुतळा ब्राँझ धातूपासून बनवण्यात आला आहे. प्रसिद्ध शिल्पकार ललित धनवे यांच्या संकल्पनेतून व शिल्पकार प्रसाद मोडक यांच्या निर्मितीत हा पुतळा साकारण्यात आला आहे. पुतळ्यावरील चित्रकाम चित्रकार कविता देशमुख यांनी साकारले आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या सर्व प्रशासकीय परवानग्या चिखलीच्या आमदार श्वेता महाले यांनी राज्य शासनाकडून मिळवून दिल्या असून, त्यांनी या




पुतळ्यासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय पुतळा समितीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही झाली.

# रिमझिम पावसातही रस्त्यावर डबके, घरांचे बांधकाम झाले उंच

## रस्ते खाली गेल्याने दरवर्षी उद्भवतेय समस्या

विदर्भ प्रजासत्ताक **दि.२६अकोला –** मंगळवारी दुपारी झालेल्या पावसाने शहरातील तोष्णीवाल ले- आऊट, जवाहर चौक बारा ज्योतिर्लिंग मंदिर, जुने शहरातील रमेशनगर, वाशीम रोडवरील रुपचंदनगर आणि सहकार नगरातील ब्लेसिंग टॉवरलगतच्या रस्त्याला अक्षरश: तलावाचे स्वरूप आले होते.

तासाभराच्या रिमझिम पावसाने गुडघ्यापेक्षा जास्त पाणी या रस्त्यांवर साचल्याने अनेक वाहने बंद पडली. काहीजण घसरून पडून जखमीदेखील झाले.अकोला शहरातील अशी काही विशिष्ट ठिकाणे आहेत की



तेथे किरकोळ पाऊस जरी झाला की तेथे काही वेळातच गुडघाभर पाणी साचते, अशा काही निवडक ठिकाणी 'दिव्य मराठी'च्या प्रतिनिधीने बुधवारी भेट देऊन पाहणी केली असता अनेकांच्या घरांचे बांधकाम उंच झाले आणि रस्ते खाली गेल्याने उदभवतेय समस्या उद्भवत असल्याचे दिसून आले. तसेच या रस्त्यांवर पाण्याचे डबके साचण्याच्या ठिकाणी पाण्याच्या निचरा होण्यासाठी गटारींचा अभाव असल्या चे दिसून आले.

# उपसलेल्या गाळाची ४८ तासांत विल्हेवाट लावा

## महानगरपालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांचे निर्देश

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२६अमरावती–**
महानगरपालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी आज दिनांक २५ जुन,२०२५ रोजी अकोली, त्रिकोणी परिसर कॅम्प परिसराची पाहणी केली. या पाहणी दरम्यान छोट्या व मोठ्या नाल्यांचे खोलीकरण करावे, नाल्यांमधून उपसलेल्या गाळाची ४८ तासांमध्ये निश्चित केलेल्या स्थळावर विल्हेवाट लावावी, त्याचबरोबर पावसाळ्यात नाल्यांचा प्रवाह वाहता राहील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश महानगरपालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी अतिक्रमण विभागाला दिले आहेत. सदर कामांचा भाग म्हणून सध्या मोठ्या व लहान नाल्यामधून गाळ काढण्याची कामे वेगाने सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार गाळ उपशाचे काम सुरू आहे. उर्वरित गाळ काढण्याची कामे वेगाने पूर्ण केली जातील, असे अतिक्रमण विभागाने सांगितले.

महानगरपालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी शहरातील नाल्यांची नियमित



साफसफाई करण्याचे निर्देश दिले. शहरातील आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. नियमितपणे नाल्यांची साफसफाई करणे आवश्यक आहे, जेणेकरून पावसाचे पाणी योग्यप्रकारे वाहून जाईल आणि कुठल्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, असे उपायुक्तांनी सांगितले.

नाल्यांमध्ये कचरा टाकल्यास ते तुंबतात, त्यामुळे नागरिकांनी कचरा नाल्यात न टाकता तो कचराकुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्तांनी केले आहे. जर कोणी नाल्यांमध्ये कचरा टाकतांना आढळल्यास, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपायुक्तांनी दिला आहे.

या पाहणी दरम्यान अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# अंजनगाव बारी विद्युत कनिष्ठ अभियंत्याविरूध्द नागरिक संतप्त

## वरिष्ठांकडे तक्रार करूनही अद्याप कारवाई नाही

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अंजनगाव बारी

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित बडनेरा (ग्रामीण) उपविभाग अंतर्गत येणाऱ्यावीज वितरण केंद्र ३३/११ के. व्ही. उपकेंद्र अंजनगाव बारी येथील कनिष्ठ अभियंत्याच्या मनमानी कारभाराला कंटाळून परिसरातील नागरिकांनी वरिष्ठांकडे तक्रार दाखल केली आहे; मात्र कनिष्ठ अभियंत्यावर अद्यापही कोणतीही कारवाई न झाल्याने परिसरातील नागरिक संभ्रमात आहेत.अंजनगाव बारी वितरण केंद्राच्या हद्दीत येणाऱ्या मांजरी म्हसला येथील ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीनुसार कनिष्ठ अभियंता वीज संदर्भातील कुठलेही तक्रार कॉलद्वारे कळविण्यात आली




असता त्यातक्रारीचा प्रतिसाद मिळत नाही, तसेच त्या तक्रारीसंदर्भात फोन कॉल केले असता कार्यालयीन वेळेत कॉल करायचा, असे नियम त्यांच्याकडून सांगण्यात येतात, तसेच गावात वीजबिल वसुलीसाठी आले असता महिलांशी हुज्जत घालणे अपशब्द बोलणे, महिलांशी गैरवर्तणूक करणे, दबाव टाकणे हा प्रकार जास्त प्रमाणात वाढत आहे.

# पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाचा निकालात विदर्भातून अव्वल







विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

केवळ तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या परंतु अल्पावधीत रुग्ण व विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष बी .ए. एम. एस. च्या विद्यापीठ निकालात विदर्भातून अव्वलस्थानी राहण्याचा बहुमान पटकाविला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने २०२३- २४ या शैक्षणिक क्षेत्रात प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा मार्च एप्रिल २०२५ ला झाली. त्याचा निकाल आज जाहीर झाला. विदर्भात २३ आयुर्वेद महाविद्यालय असून यात १ शासकीय ५ अनुदानित व उर्वरित खाजगी महाविद्यालये आहेत या निकालात २३-२४ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या ९५ टक्के तर २०२२ रिपीटर सह ८८% एवढा निकाल लागला आहे. महाविद्यालयातून प्रथम क्रमांकावर श्रुती राऊत, दुसऱ्या क्रमांकावर शिवम ढेरे, तृतीय क्रमांकावर दिबा फलक यांनी उच्च गुण प्राप्त केले. आयुर्वेद महाविद्यालयातील रुग्णालयातील चिकित्सा व महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा पाहता राज्य व राज्याबाहेरील विद्यार्थी महाविद्यालयाला प्रवेश करिता पसंती देत आहे. संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. श्याम भुतडा , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रस्त्यांच्या समस्येसाठी दर्यापुरात आमरण उपोषणाला सुरूवात

## परिसरातील महिलांनीही उपोषणाला दिला पाठिंबा लोकप्रतिनिधींनी उपोषण मंडपाकडे फिरवली पाठ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६दर्यापूर

दर्यापूर शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख कॉलनी परिसरव्त्या सोबतच शिवर रोड धान्य बाजार मार्ग, डॉ. साबळे हॉस्पिटल मार्ग, डॉ. कट्टा हॉस्पिटल मार्ग, डॉ. म्हाला हॉस्पिटल मार्ग आणि कोकाटे कॉम्प्लेक्स मार्ग या रस्त्यांची प्रदीर्घ काळापासून अत्यंत दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. या रस्त्याच्या अतिगंभीर बाबींकडे अद्यापही नगरपरिषद विभाग व लोकप्रतिनिधी यांचे लक्ष नसल्याने गेल्या वीस वर्षापासून या परिसरातील रस्त्यांच्या समस्या जैसे थेच आहेत. दोन महिन्यांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते ओम राणे या युवकाने ठिकठिकाणच्या दुर्लक्षित रस्त्यांवर आमदार, खासदार विरोधात जाहीरातबाजी करीत जनआंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर ओम राणे याने मंगळवारपासून डॉ. साबळे हॉस्पिटल हिंगणी रोडवर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. आज उपोषणाचा दुसरा




दिवस असून परिसरातील पुरुष व महिलांनी सुद्धा उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला. सांगळूदकर नगर व लगतच्या परिसरातील रस्त्याने मार्गक्रमण करताना जनसामान्य नागरिकांसह वयोवृद्ध नागरिकांना शालेय विद्यार्थ्यांना मार्गक्रमण करताना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. सदर मार्ग हा मोठ्या वर्दळीचा असल्याने या रस्त्यांवर टोलेजंग खड्ड्यांची निर्मिती झाली आहे. आता पावसाळ्याचे दिवस असून त्या खड्ड्यामध्ये दिवसाकाठी अपघाताची मालिका सुरुच आहे. खड्डा वाचवण्याच्या धडपडीत अनेक वाहने घसरल्या गेली आहेत. तरी या अतिगंभीर रस्त्यांच्या समस्यांकडे संबंधित विभाग व लोकप्रतिनिधीचे पूर्णपणे डोळेझाक दिसून येत आहे. सदर परिसरातील नागरिक पालिकेला नियमित कराचा भरणा करत असतानासुद्धा त्या तुलनेत सेवा सुविधा अपुऱ्या पडत आहेत. संतप्त झालेल्या ओम संजय राणे यांनी परिसरातील रस्ता कॉंक्रिटिंग किंवा कमीत कमी डांबरीकरण करण्यासाठी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे उपोषण मंडपस्थळी परिसरातील नागरिकांनी भेटी देत लेखी अभिप्राय नोंदवत आहे. यासह आज दुसरा दिवस असून वैद्यकीय चाचणी त्यांची करण्यात आली असून शुगर आणि बीपी कमी झाल्याचे बोलले जात आहे.

# दुचाकी वाचवतांना अरूंद पांदण रस्त्यातील अतिक्रमणामुळे ट्रॅक्टर पलटी

## थोडक्यात बचावले शेतकऱ्यांचे प्राण, सुदेवाने जीवितांचा अनर्थ टळला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अंजनगाव बारी

ग्रामीण अंजनगाव बारी शिवारातील पांदण रस्ते कमी रुंदीचे असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या कामात ये आ करण्यास नेहमीच अडचणी निर्माण होत असून काही ठिकाणी पांदण रस्ते इतके अरुंद होत बालले आहे की शेतकऱ्यांना शेतीची कामे करण्यास अडचणी येत आहे, तर काही ठिकाणी अतिक्रमणामुळे रस्त्यांची योग्य देखभाल न केल्यामुळे त्यांची रुंदी कमी झाली आहे. अरुंद रस्त्यामुळे शेतक-यांना शेतीमाल ट्रॅक्टर किंवा इतर मोठ्या वाहनाने नेताना अडचणी येत आहे.तसेच शेतीची मशागत करण्यासाठी, बियाणे, खते आणि इतर साहित्य वाहून नेण्यासाठी अडचणी येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त पैसे खर्च करून वाहतूक कराडी लागत असून अशा विविध समस्यांचा



शेतकऱ्यांना सामना दररोज करावा लागेल आहेअंजनगाव बारी येथील गावठाणाकडे जाणाऱ्या केसरी शेतशिवार रस्त्यावर २५ सकाळच्या सुमारास दुचाकीस्वार शेतकऱ्यांना (क्रॉसिंग) वाचवत असताना शेतकरी जीवन हटवार यांचा ट्रॅक्टर बाजूच्या रस्त्यावरील नाल्यात पडला. सुदैवाने जीवितहानी घटना टळली असून त्यानी आपल्या स्वखर्चाने जे. सी. बी. आणून ट्रॅक्टर काढला त्यात ट्रॅक्टरच्या साहित्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी पांदण रस्त्यावर अतिक्रमण त्वरित काढण्याची मागणी केली असून मान्सूनपूर्व पेरणीपूर्वी रस्त्यांचीनियमित दुरुस्ती करुण त्यांची योग्य रुंदी राखावी, तसेच शेतकऱ्यासाठी पांदण रस्ते योजना राबवून त्यांना मदत करावी. शेतकऱ्यांमध्ये पांदण रस्त्यांचे महत्त्व आणि त्यांच्या योग्य वापरासाठी जागरूकता निर्माण करावी. यासंदर्भात तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि त्यांची शेतीची कामे व्यवस्थित चालू शकेल.

# नगराध्यक्षपदासाठी अनेक दावेदारांनी बांधले बाशिंग

## आरक्षण सोडतीकडे लागले सर्वांचे लक्ष

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६चांदूर बाजार :

नगरपरिषद निवडणुकीचे पडघम वाजले असून काही महिन्यातच प्रभागरचना पूर्ण होताच ऑक्टोबरमध्ये निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे: मात्र अद्याप नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर न झाल्यामुळे जनता व सर्वच राजकीय पक्षाचे आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. अलीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती लढणार असल्याने सूतोवाच नुकतीच महायुती नेत्यांकडून झाली असल्याने नगराध्यक्षपदासाठी महायुतीतील अनेक दावेदारांनी गुडघ्याला बाशिंग बांधले असून आरक्षणाची वाट पाहत आहे.

शहरातील सर्वच पक्षांकडून नगराध्यक्षपदासाठी सक्षम उमेदवाराची चाचपणी सुरू




झाली आहे, तर काही जण आधीपासूनच बाशिंग बांधून तयार आहेत. नगरपरिषदेचे नगराध्यक्षपदाचे आरक्षण अजूनपर्यंत जाहीर झाले नाही. तरीही सर्वच पक्ष इच्छुक उमेदवाराला उमेदवारी मिळावी म्हणून वरिष्ठ नेत्याच्या संपर्कात आहेत. भाजप, प्रहार, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.), राष्ट्रवादी (अ.प.) शिवसेना (उबाठा) आणि इतर पक्षांचे नेते योग्य उमेदवाराच्या शोधात असून यासाठी चाचपणी करीत आहेत.प्रहार, भाजप आणि कॉंग्रेस काही मोजकेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या शर्यतीत असून तयारीला लागले आहेतः परंतु भाजपमध्ये उमेदवारीबद्दल मोठा पेच निर्माण होऊ शकतो. राष्ट्रवादी अजित पवार गटातही नगराध्यक्षपदाच्या निवडीसाठी उमेदवारांची चाचपणी सुरु आहे. प्रहार व भाजपमध्ये इच्छुकांची संख्या जरी अधिक असल्याचे चित्र दिसत असले तरी मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतांच्या टक्केवारीमधून महाविकास आघाडीचे कॉंग्रेस उमेदवार यांना चांदूरबाजार शहरातून जास्त मते असल्याने जर महाविकास आघाडीनेसुद्धा निवडणुका लढवण्याची घोषणा केली, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिक रंगतदार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सबळ उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे, हे सध्या सांगणे कठीण आहे. नगराध्यक्षपदासाठी अद्याप आरक्षण जाहीर झालेले नाही. पक्षाकडून तिकीट जाहीर करण्यात आलेले नाहीः मात्र असे असतानाही काही इच्छुकांना तर आतापासूनच उत्सुकता अनावर होऊ लागल्याचे दिसत आहे या इच्छुकांची तयारी बघता त्यांना आतापासूनच नगराध्यक्षपदाचा ताप चढल्याचे बघावयास मिळत असून तो सध्या तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे.

# खिचडी की डाळ तडका ? तेल, डाळीचे दर आवाक्यात आल्याने सणांपूर्वी काहीसा दिलासा: भाजीपाल्यासह अन्य किराणा साहित्य मात्र कडाडलेलेच

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती

केंद्र सरकारने आयात शुल्क १० टक्क्यांपर्यंत कमी केल्याने खाद्यतेलाच्या दरात घसरण झाली आहे. दुसरीकडे डाळींचे भावही बर्यापैकी आवाक्यात आले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी भाजीपाल्यासह किराणा साहित्याचे भाव मात्र कडाडलेलेच आहेत. तात्पुरत्या स्वरूपात सध्या कमी झालेले तेल आणि डाळींचे भाव लक्षात घेता खिचडी बनवायची की डाळ तडका, याचे बेत आखले जात आहेत.

मागील काही महिन्यांत सर्वच किराणा साहित्यासह भाजीपाला, डाळ, तांदूळ, ज्वारी, गहू आणि तेल, तूप, साखर अशा साहित्याचे दर वाढल्यामुळे महागाईची झळ सामान्यांना सहन करावी लागली. दुसरीकडे सर्वच प्रकारच्या खाद्यपदार्थांचे दर वाढल्यामुळे महागाईला सामोरे जाण्याची वेळ आली. यात आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, अवकाळी पाऊस आणि विविध प्रकारच्या आयात-निर्यात धोरणाचाही



परिणाम वस्तूंच्या दरावर झाला आहे. यामुळे मागील काही दिवसांपासून वाढलेल्या दरवाढीने त्रस्त असलेल्या गृहिणींना आता दिलासा मिळाला.

**सोयाबीन, खोबरे, जवस तेलाचे भाव वाढले**

करडई, शेंगदाणा, सूर्यफुल, तीळ अशा तेलाचे दर तेवढेच आहेत. मात्र, सोयाबीन, खोबरे व जवस या तेलाचे दर वाढले आहेत, अशी माहिती किराणा व्यापारी अनिल चरडे यांनी दिली. यामध्ये सोयाबीन तेल १५ रुपयांनी, खोबरा तेल १०० रुपयांनी आणि जवस तेल ५० रुपयांनी वाढले आहे. हरभरा, उडीद, मूग, तूर अशा सर्व डाळींचे दर दरवर्षी सण, उत्सवांत वाढत असतात.

**सणावाराचे दिवस तोंडावर**

काही महिन्यांत सणावाराचे दिवस असल्याने नागरिकांना सुद्धा महागाईकमी होण्याची अपेक्षा आहे. श्रावण महिना, गणपती, दुर्गा उत्सव अशा सणांच्या निमित्ताने तेल, तुप पासून तयार होणारे विविध प्रकारचे खाद्यपदार्थ घरोघरी मोठ्या प्रमाणात बनवले जातात. यामुळे मागणीत वाढ होत असते.

# दर्यापुरात 'हाय स्पीड नंबर प्लेट' साठी दलालांचा सुळसुळाट! दर्यापूर शहरात दोनच अधिकृत केंद्रे

विदर्भ प्रजासत्ताक दि.२६दर्यापूर

उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट्स (HSRP) ही शासनाने अनिवार्य केलेली एक महत्त्वपूर्ण योजना सध्या शासनाने अंमलात आणली असून यासाठी दर्यापूर शहरात दलालांचा सुळसुळाट झाला आहे.

या नंबर प्लेटसाठी सध्या वाहनधारक आपल्या वाहनाला हायस्पीड नंबर प्लेट बसवण्यासाठी दर्यापूर शहरात दोन अधिकृत सेंटर दिलेले आहेतः मात्र दर्यापूर शहरात या नंबर प्लेटसाठी दलाल सक्रिय झाले असून ते वाहनधारकांकडून भरमसाठ पैसे घेऊन वाहनधारकांची फसवणूक करत असून अशा बेकायदेशीरपणे नंबर प्लेट विकणाऱ्या दलालांवर वाहतूक विभागाने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करून जनतेची होणारी पिळवणूक थांबवावी, अशी मागणी होत आहे.




**असे आहेत अधिकृत दर**

महाराष्ट्र शासनाने HSRP साठी निश्चित केलेले अधिकृत दर (GST आणि फिटमेंट शुल्कासह) खालीलप्रमाणे आहेत. दुचाकी / ट्रॅक्टरः ५३१ रू. प्रति वाहन, तीनचाकी वाहने (ऑटो रिक्षा): ५९० रू. प्रति वाहन, चारचाकी आणि अवजड वाहने : ८७९ रुपये प्रति वाहन.

# दिघीच्या शाळेत विदयार्थ्यांना पाठ्यपुस्तक, गणवेशासह लेखनसाहित्य मोफत

## शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा : गोड पदार्थाचे वितरण, मान्यवरांची उपस्थिती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६दर्यापूर

दर्यापूर पंचायत समिती अंतर्गत दिघी जहानपुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम सोमवारी उत्साहात झाला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, सॉक्स व बुटासह लेखन साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीराम डोंगरे होते. प्रमुख उपस्थिती सरपंच बाबुराव नितनवरे, पालक जयमाला भोरखाडे, प्रियंका अटाळकर यांची होती. सर्वप्रथम इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे कुमकुम तिलक लावून औक्षण करून व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या पायाचे ठसे कोऱ्या कागदावर घेण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठपुस्तके, गणवेश, सॉक्स व बुटासह लेखनसाहित्य उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच बाबुराव नितनवरे, आशा वर्कर संगीता हरणे, मुख्याध्यापक विनायक लकडे यांची समायोचित मार्गदर्शनपर भाषणे झाली. कार्यक्रमाला अंगणवाडी सेविका जया बुधाडे, आम्रपाली भोरखडे, आशा वर्कर योगिता दिघेकर, संगीता हरणे, प्रशिक्षणार्थी साक्षी सगणे यांच्यासह माता पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विनायक लकडे यांनी केले. संचालन सहाय्यक शिक्षिका युगंधरा पांडे यांनी तर आभार साक्षी सगणे यांनी मानले.

# श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

## महाराजस्व अभियानांतर्गत अमरावती विभागातील ५६ तालुक्यात २९९ शिबिर

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात शिबिरांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत अमरावती विभागात ५६ तालुक्यात २९९ शिबीरे घेऊन विद्यार्थी, महिला, शेतकरी, नागरिकांना महत्वाचे दाखले व योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दिशा-निर्देशानुसार राज्यात सर्वत्र मंडळस्तरावर हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्य शासनाने पारदर्शी आणि गतीमान सरकारचे धोरण ठरविले आहे. सर्वसामान्य जनतेची शासकीय कार्यालयातील कामे सहजपणे आणि विनातक्रार होण्यासाठी यंत्रणा राबविण्यात येत आहे. महसूल विभागाशी निगडीत नागरिकांच्या आवश्यक कामांसाठी प्रत्येक मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर




प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.जिल्हा वार्षिक योजनेमधून गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण अंतर्गत मंडळ स्तरावर हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे या योजनेचे नामकरण श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान असे करण्यात आले. या अभियानांतर्गत अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यात ९५ मंडळस्तरावर ६२ शिबीरे घेण्यात आली आहेत. अकोला जिल्ह्यातील ७ तालुक्यात ५२ मंडळात ५२ शिबीरे, यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यात ११० मंडळात ५० शिबीरे, बुलडाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यात ९२ मंडळात ९२ शिबीरे तर वाशिम जिल्ह्यातील ६ तालुक्यात ४६ मंडळात ४३ महाराजस्व शिबीरे घेण्यात आली आहेत..महसूल विभागांतर्गत राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकालात काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी राज्यात सर्वत्र मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळस्तरावर वर्षातून किमान चार वेळा अभियान आयोजित करण्यात येईल.

यामध्ये ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रांचे वितरण, शिधा पत्रिकांचे वाटप, भूमीहीन दाखले, आयुष्यमान गोल्डन कार्ड, रोहयो जॉब कार्ड तसेच संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना आदी सामाजिक लाभाच्या योजना इत्यादींचा लाभ देण्यात येईल.तसेच या अभियानांतर्गत सात-बारा, आठ- अ वाटप, प्रलंबित फेरफार नोंदी निर्गत करणे व विविध शासकीय योजनांसाठी लागणारे दाखले अशा महसूल विभागाच्या विविध योजना आदींबाबत सुद्धा आवश्यक ते कामकाज करण्यात येईल.जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. बावनकुळे यांच्या निर्देशानुसार नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी विविध पावले उचलण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांचे कामे प्रामाणिकपणे करून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मंडळ स्तरावर होणाऱ्या महाराजस्व अभिनायात आलेल्या नागरिकांच्या अर्जावर त्याच ठिकाणी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. जनतेचे कल्याण करण्याचा संकल्प करण्यात आला असून प्रशासनाचे सहकार्य यात घेतले जात आहे. या अभियानांतर्गत महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या अनुषंगाने प्रयत्नशील राहण्याच्या सूचना सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आल्या आहेत.

# पोषण आहारात सुधारणा! दररोज ६.७८ ते १०.१७ इतका खर्च मंजूर

## १ मेपासून सुधारित दर लागू: शाळेत मिळणार आहार

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शालेय पोषण आहार योजनेतील प्रति विद्यार्थी खर्चात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हा सुधारित दर १ मे २०२५ पासून लागू करण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक पौष्टिक आहार मिळण्यास मदत होणार आहे.



प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतून इयत्ता पहिली ते पाचवी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तसेच सहावी ते आठवीमधील उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार देण्यात येतो.

योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन, प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. आता केंद्र शासनाने प्रतिदिन, प्रति लाथार्थी आहार खर्चाच्या दरात वाढ करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ४ मार्च २०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रतिदिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा प्राथमिक वर्गासाठी ६.१९ रुपये व उच्च प्राथमिक वर्गासाठी ९.२९ रुपये निश्चित करण्यात आली होती.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत आहार खर्चाच्या दरास मान्यता मिळाली आहे. १ मेपासून सुधारित दरानुसार पैसे मिळणार आहेत.

नव्या शासन निर्णयानुसार प्रतिदिन, प्रति लाभार्थी आहार खर्च प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांसाठी ६.७८ रुपये, तर उच्च प्राथमिक लाभार्थी गटासाठी १०.१७रुपये एवढे दर निश्चित करण्यात आले आहे.यापूर्वी शाळेत पोषण आहार शिजविण्यासाठी अनेकवेळा निधीअभावी शिक्षकांनाच तेल-मिठाचा खर्च करावा लागायचा. आता शिक्षकांना स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च वाचण्यास मदत मिळणार आहे.

**किती विद्यार्थ्यांना लाभ ?**

पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवी या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टळली.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश , अमरावती जिल्ह्याचे सुपुत्र मा. भूषण गवई साहेब यांचे पी.आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती च्या भव्य स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम येथे आयोजित सत्कार समारंभ सोहळ्याकरिता आगमन निमित्त पी . आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती च्या वतीने माजी राज्यमंत्री , संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रविण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी शाल ,श्रीफळ पु व पूष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



अमरावतीचे सुपूत्र न्यायमूर्ती भूषणजी गवई यांना देशाचे सरन्यायाधीश होण्याचा बहुमान मिळाला, ही अमरावतीसाठी गौरवाची बाब आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच त्यांचे अमरावती येथे आगमन झाले आणि त्यांचा जन्मभूमीत सत्कार समारंभाचा पहिला सोहळा पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या भव्य स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम मध्ये पार पडला ही आमच्या संस्थेसाठी ऐतिहासिक व गौरवाचा क्षण आहे. त्यांच्या नेतृत्वात भारतीय न्यायव्यवस्थेतील समावेशिता आणि विविधता अधिक बळकट होईल असे प्रतिपादन यावेळी श्री प्रविण पोटे पाटील यांनी केले.यावेळी एड. प्रवीणजी मोहोड, प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर , प्रकाशजी पुंड, कपिलजी आंडे व मान्यवर उपस्थित होते.

# यंदा शाळांना १२८ दिवस सुट्ट्या; शिक्षण विभागाने केली यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

२३ जूनपासूनच शाळा सुरु झाल्या आहेत. शाळा सुरु झाल्यानंतर आता शाळांच्या वर्षभरातील सुट्ट्यांची यादीदेखील जाहीर झाली आहे. राज्यातील सर्व शाळांना एकूण १२८ दिवस सुट्ट्या असणार आहे. यामध्ये सणवार आणि उन्हाळी सुट्ट्यांच्या समावेश आहे. रविवारच्या सुट्ट्यांचादेखील यात समावेश आहे.




जिल्हा परिषदेची शाळा सकाळी साडेदहा वाता भरणार आहे आणि संध्याकाळी ५ वाजता सुटणार आहे. तर अर्धवेळीची शाळा नऊ ते दुपारी दीड वाजेपर्यंत असणार आहे. शाळेच्या दिवशी ६० मिनिटांची सुट्टी असणार आहे. तर पहिल्या व दुसर्या सत्रात १०-१० मिनिटांच्या दोन सुट्ट्या असणार आहे.

### अश्या आहेत वर्षभरातील सुट्ट्या

जुलै : आषाढी एकदशी, मोहरम, नागपंचमी
ऑगस्ट : रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, गणेश चतुर्थी
सप्टेंबर : गौरी विसर्जन, ईद-ए- मिलाद, अनंत चतुर्दशी, घटस्थापना
ऑक्टोबर : गांधी जयंती आणि दिवाळीची सुट्टी
नोव्हेंबर : गुरूनानक जयंती
डिसेंबर : ख्रिसमस- नाताळ
जानेवारी : मकरसंक्रांती, शबे- ए- मेराज, प्रजासत्ताक दिन
फेब्रुवारी : शब-ए-बरात, महाशिवरात्री, श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती
मार्च : धुलिवंदन, रंगपंचमी, शब-ए-कदर, गुढी पाडवा, रमजान ईद, रामनवमी, महावीर जयंती
एप्रिल : गुड फ्रायडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती
मे : महाराष्ट्र दिन, उन्हाळा सुट्टी

# बोगस कृषी कंपन्या शिरजोर? कृषी विभागाने आपल्याच अधिकाऱ्यांचे अधिकार घेतले काढून

## धाडी, केंद्र तपासणी, नमुने घेण्याचे अधिकार हि काढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

शेतकर्यांना भेसळमुक्त, गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठा, बियाणे, खते व कीटकनाशके मिळावीत, यासाठी कृषी विभागाने गुणनियंत्रण अधिकारांचे विकेंद्रीकरण केले होते. मात्र, २० जून रोजी जारी अधिसूचनेद्वारे कृषी विभागाने आपल्याच अधिकार्यांचे अधिकार काढून घेतले आहेत. बोगस कृषी कंपन्यांच्या दबावात शासनाने आपलाच गुणनियंत्रण विभाग दुबळा केल्याचा आरोप यानिमित्ताने होत आहे.




यापूर्वी कृषी निविष्ठांचे कंपनी पातळीपासून डीलर व कृषी केंद्रांपर्यंत नमुने घेतले जात होते. हे नमुने शासनाच्या प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठवून, अहवालानुसार संबंधितांवर तात्काळ कारवाई केली जात होती. राज्यात यासाठी पं. स. कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तंत्र अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक, जिल्हा गुणवत्ता कृषी अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, जि.प.चे मोहीम अधिकारी अशी फळी कार्यरत होती. त्यामुळे बियाणे, कीटकनाशके, खते उत्पादक व विक्रेते यांना भेसळ करायला वाव कमी व शासनाचा वचक कायम होता.

ही बाब निविष्ठा उत्पादकांना बाधक होती, त्यामुळेच कृषी अधिकार्यांचे अधिकार कमी करून विभाग दुबळा करण्यात आल्याचे मानले जात आहे. यात आयुक्तालयातील काही अधिकार्यांची नावे चर्चेत आहेत. आता पूर्णवेळ व अर्धवेळ गुणवत्ता निरीक्षकांची संख्या कमी करून नवीन गुणवत्ता निरीक्षक अधिसूचित केल्याने हा विभाग पांगळा झाला आहे. तथापि 'माफदा'ने या निर्णयाचे स्वागत केले आहे.

**जे पदच अस्तित्वात नाही, त्यांच्याद्वारे गुणवत्ता नियंत्रण**

खरीप हंगामात राज्यात गुणवत्ता निरीक्षकांची ७० टक्के संख्या कमी झाल्याने शेतकर्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा मिळाव्यात, या उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे. आता तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर गुणवत्ता नियंत्रकांना गुण निरीक्षकाचे अधिकार दिले. प्रत्यक्षात तालुका गुणनियंत्रक हे पदच अस्तित्वात नाही. त्यामुळे कारवाई कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# उत्पन्नावर आधारित सुधारित पीक विमा योजना झाली जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

राज्याच्या कृषी-पशुसंवर्धन मंत्रालयाने उत्पन्नावर आधारित सुधारित पीक विमा योजना जाहीर केली आहे. ही सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५-२६ साठी लागू राहणार आहे.

मागील योजनेत शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा योजनेचा लाभ दिला जायचा. नव्या योजनेत उत्पन्नावर आधारित योजना राहणार आहे. नैसर्गिक आपत्ती कीड आणि रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे, कृषी क्षेत्रासाठीच्या पंतपुरवठ्यात सातत्य राखणे हे या योजनेचे उद्देश आहेत.खरीप व रब्बी हंगामाच्या वेळी कृषी विभागाच्या वतीने कृषीविषयक परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण आणि सनियंत्रण करण्यासाठी जिल्हास्तरीय आढावा समिती गठित केली जाणार आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहणार असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सर व्यवस्थापक, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी, विमा




कंपनीचे प्रतिनिधी सदस्य असतील, तर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हे सदस्य सचिव असतील.ही समिती प्रत्येक पंधरवड्यात प्रत्येक पिकांची पेरणी क्षेत्र हवामान परिस्थिती कीड व रोगांचा प्रादुर्भाव पिकांच्या नुकसानीचा अंदाज आदींबाबतचा सविस्तर अहवाल विमा कंपनीला सादर करेल.

**पर्यवेक्षणासाठी राहणार सुकाणू समिती**

पिकांच्या उत्पन्नाची आकडेवारी कृषी विभागाला अचूक व वेळेवर उपलब्ध होण्यासाठी पीक कापणी प्रयोगांचे नियोजन व अंमलबजावणी आणि पर्यवेक्षणासाठी सुकाणू समिती स्थापन केली जाणार आहे. यात निवासी उपजिल्हाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असतील, तर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाचे तंत्र अधिकारी हे सदस्य सचिव असतील.तसेच तालुका स्तरावरदेखील समिती राहणार असून, त्या समितीचे अध्यक्ष तहसीलदार तर सदस्य सचिव तालुका कृषी अधिकारी असतील.

**योजना फक्त अधिसूचित केलेल्या पिकांसाठीच**

ही योजना फक्त अधिसूचित केलेल्या पिकांसाठीच आणि अधिसूचित क्षेत्रासाठीच लागू राहणार आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ती ऐच्छिक राहणार आहे. कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे या योजनेत भाग घेण्यास पात्र असतील.